सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, ०९ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ठाणा गावात अज्ञात तापाने दोन मुलांचा मृत्यू झाला असल्याने जिल्हास्तरीय पथक गावात



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ८ फर्दापूर: सोयगाव तालुक्यातील ठाणा गावात अज्ञात तापाच्या साथीने आठवडाभरात दोन बालकांचा मृत्यू झाल्याने जिल्हा आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

शनिवार (दि.८) सकाळी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हास्तरीय आरोग्य पर्यवेक्षक बी.बी.पाटील,आरोग्य निरीक्षक एस.एस.शेंडगे व ए.बी. आगळे यांच्या पथकाने ठाणा गावात भेट देऊन राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमासाठी गावात सर्वेक्षण केले.शनिवारी आरोग्य पथकामार्फत डेंग्यू २० तर मलेरियाच्या ६५ तपासण्या करण्यात आल्या असून १८ व्यक्तींचे रक्तजल नमुने पुढील तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.यावेळी ११ रुग्णांचे हिवताप विषयक रक्त नमुने तपासले असून त्यांचा अहवाल हा निगेटिव्ह आला आहे.असे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

पथकाने संपूर्ण गावात सर्वेक्षण करून गावातील लोकांना आरोग्य विषयक काळजी घेण्याचे आवाहन यावेळी केले आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ.स्नेहल वारंगणे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी ज्ञानेश्वर पाटील, लॅब टेक्निशियन सागर घायवट, ईश्वर निकम आणि आरोग्य सेवक अमोल धमके,दादाराव झोंड,राजेंद्र कदम,श्याम आढाव, गोपी राठोड, विलास राठोड यांचे पथक गावात ठान मांडून बसले आहेत.

## बिडकीन येथे पालकमंत्री संजय शिरसाट यांचा नागरिक सत्कार



तभा वृत्तसेवा बिडकीन दि ८ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील बिडकीन येथे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांचा नागरी सत्कार कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते, आज दि ८ फेब्रुवारी शनिवार रोजी बिडकीन व सर्कल मधील ग्रामपंचायत सरपंच व सदस्य तसेच नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला, पालकमंत्री संजय शिरसाट यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन ,बिडकीन येथील कोकण वेस हनुमान मंदिर मध्ये दर्शन घेतले, व कोकण वेस मारुती मंदिर येथे चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताह येथे दर्शन घेतले, यावेळी अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या वतीने पालकमंत्री शिरसाट , माजी महापूर नंदकुमार घोडले, अशोक पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला व बिडकीन नागरिकांच्या वतीने सर्कलमधील ग्रामपंचायत सरपंच सदस्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला ,यावेळी बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे, बंडू खराडकर,ह भ प कृष्णा महाराज आरगडे, मधुकर वाणी, पत्रकार नंदकुमार वैद्य,ह भ प एकनाथ महाराज जाधव, किसानलाल तोतला ,ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे , रमेश शिंदे,किरण गुजर, माजी सरपंच ओमप्रकाश जैस्वाल,मोहन हिवाळे, ज्ञानेश्वर कांबळे, अशोक हिवाळे, डॉ सुरेश जंगले, काकासाहेब टेके,अनिल गव्हाणे, माजी सरपंच लक्ष्मण रहाटवाड, ड सतीश हाडे,सरपच सुरेश भिसे, लक्ष्मण वाघ,बबन ठाणगे, कांता डोळस, आनंदा ठाणगे, दिगंबर कोथिंबीरे,आदी शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



हिंगोली : दिल्ली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला घवघवित यश प्राप्त होऊन एक हाती सत्ता आल्याबद्दल हिंगोली शहर भाजपा तर्फे आज गांधी चौक येथे ढोल ताशा च्या गजरात फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

यावेळी सर्वश्री आमदार तानाजीराव मुटकुळे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आमदार गजाननराव घुगे माजी आमदार रामरावजी वडकुते माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा हमीद प्यारेवाले, प्रशांत सोनी, महिला शहराध्यक्ष अलका लोखंडे, तालुकाध्यक्ष माणिक लोडे,नंदाताई इंगळे ,सुनंदा मिश्रा, सुनीता मुळे,कृष्णा रुहितिया, रजनीश पुरोहित, आशिष शर्मा, गुडू देवकाते, बाबा घुगे, मनोज शर्मा, कैलास शहाने, कृष्णा ढोके, नागेश बांगर, नारायण खेडेकर, अंकुश आहेर सचिन शिंदे, जहिरव ताई, जय घोडे, आशिष जयस्वाल आदी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिर्डीत अवैध दारू विक्रेत्यांवर छापे; २८ हजाराचा मुद्देमाल जप्त



नगर : स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारू विक्रेत्यांची माहिती काढून ०५ वेगवेगळ्या ठिकाणी पंचांसमक्ष छापे टाकले. यामध्ये सुमारे २८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथील विद्यार्थ्यांनी घेतला स्वनिर्मितीचा अनुभव

### विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर दिसून आला स्वनिर्मितीचा आनंद



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ फेब्रुवारी

सोयगाव केंद्रातील उपक्रमशिल शाळा म्हणून नावारूपास आलेली जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे आनंददायी शनिवार उपक्रमातर्गत सोयगाव गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी याच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांना पोळी,भाजी निर्मितीचा आनंद घेता यावा या हेतूने शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील व सहशिक्षक गोपाल चोधरी यानी शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यासाठी चुल तयार करून त्यावर विद्यार्थ्यांनी स्वतः पीठ,कणिक मळण्या पासून ते पोळी,भाकरी तयार करण्या पर्यत तसेच भाजी चिरण्यापासून ते भाजीला फोळणी देऊन भाजी तयार करण्याचा अनुभव घेतला या स्वनिर्मितीचा विद्यार्थ्याच्या चेहर्यावर आनंद दिसून येत होता.या उपक्रमास समाजसेवक राजु कुडके,माजी नगरसेवक सिकंदर तडवी,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य योगेश बोखारे,उपाध्यक्षा वैशाली पवार,आमखेडा येथील मुख्याध्यापक सविता पाटील,सहशिक्षिका कामिनी बोरसे पालक भारत सोनवणे,छाया सोनवणे,पर्वताबाई कुडके,सुनिता जोहरे,मनिषा देठे,आशाबाई इगळे,मिराबाई गोसावी,लक्ष्मी जेठे,सखुबाई कळवत्रे याच्यासह पालकानी भेट दिली.उपक्रम यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यानी परिश्रम घेतले. पालकाकडून हा उपक्रमा राबविल्या बद्दल शाळेचे कौतुक होत आहे.

## शहराध्यक्ष जितू परदेशी यांच्या मागणीला यश

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८ :- पैठण शहराची महत्वाची बाजारपेठ असलेल्या सराफा मार्केट परिसरात चोकअप नाल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी आणि घाण पसरल्याने याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष जितूभाऊ परदेशी यांनी नगर परिषदेला निवेदन देऊन स्वच्छता नाही झाल्यास याच ठिकाणी आंदोलन करण्याचा ईशारा दिला होता. यावर नगर परिषद प्रशासनाने खडबडून जागे होऊन सदरील नाल्याचे काम हाती घेतले आहे.



मेन रोड महाराणा प्रतापनगर लगत मोठे सारफा मार्केट असून याठिकाणी नेहमीच ग्राहक तसेच नागरिकांची वर्दळ असते परंतु याठिकाणी अनेक महिन्यांपासून गटारीचे पाणी रस्त्यावर वाहत असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते. याबाबत येथील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष जीतूभाऊ परदेशी यांची भेट घेऊन समस्या सोडवण्यासाठी विनंती केली होती. यावर शहराध्यक्ष जीतूभाऊ परदेशी यांनी नपला निवेदन देऊन नाल्यांचे काम करावे नसता याठिकाणीच ११ फेब्रुवारी रोजी आंदोलन छेडण्यात येईल असा ईशारा दिला असता शनिवारी नगर परिषदेच्या वतीने परदेशी यांच्या उपस्थितीत सदरील नादुरुस्त नाले दुरुस्त करण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष जीतूभाऊ परदेशी यांच्या मागणीला यश आले आहे.

## भारतीय रेल्वे: चला काश्मीरला जाऊया!

चिनाब नदीच्या खोल हिरव्या पाण्याचे मोजमाप करणारा जगातील सर्वात उंच रेल्वे पूल, थंड वाऱ्यांसह तुम्हाला साहसाची एक अनोखी अनुभूती देतो. उंच पर्वतरांगांनी वेढलेला, चिनाब नदीवरील हा पूल समुद्रसपाटीपासून ३५९ मीटर उंचीवर आहे - आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर उंच आणि कुतुबमिनारपेक्षा जवळजवळ पाच पट उंच! ढगांचा मुकुट परिधान केलेला, पर्वतांच्या छातीवर रुंद आणि मजबूत पायांच्या आधारावर उभा असलेला, हा पूल केवळ भारतीय रेल्वेच्या तांत्रिक जाणीवेचे प्रतीक नाही तर आधुनिकीकरणाच्या आपल्या आकांक्षांची आठवण करून देतो. अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि देखभालीने सुसज्ज, २६६ किमी प्रतितास वेगाने येणाऱ्या वाऱ्यांना तोंड देण्यास सक्षम, चिनाब पूल उधमपूर - श्रीनगर - बारामुल्ला रेल लिंक (णड्डइठङ) च्या उत्कृष्ट कामगिरीचे प्रतिनिधित्व करतो.

जवळजवळ ३७,००० कोटी खर्चून बांधलेला, णड्डइठङ चा २७२ किमी लांबीचा रेल्वे मार्ग जगातील सर्वात जटिल आणि आव्हानात्मक प्रकल्पांपैकी एक आहे.

खडकाळ दऱ्या आणि उंच पर्वतांमधून जाणारा हा रेल्वे मार्ग ९४३ पूल आणि ३६ प्रमुख बोगद्यांमधून जातो, ज्यामध्ये भारतातील सर्वात लांब रेल्वे बोगदा, ढ-५०, जो १२.७७ किमी लांबीचा आहे, समाविष्ट आहे. भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे पूल, अंजी खाड पूल, यूएसबीआरएलच्या कटरा-बनिहाल विभागात आहे. ९६ केबल्सनी सपोर्ट केलेला, ७२५ मीटर लांबीचा आणि ३३१ मीटर उंचीचा हा पूल डिझाइन आणि अभियांत्रिकीचा एक अद्भुत चमत्कार आहे.



काश्मीरला व्यापक आणि अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करणाऱ्या या मार्गावर जगातील काही सर्वात आकर्षक आणि सुंदर दृश्ये देखील आहेत. या रेल्वे लिंकमध्ये पर्यटन, व्यापार आणि सुरक्षा वाढण्याची क्षमता आहे ज्यामुळे जम्मू आणि काश्मीरची सामाजिक-आर्थिक परिस्थिती सुधारेल. या मार्गावर बांधलेली रेल्वे स्थानके जम्मू आणि काश्मीरच्या प्रगती, सुरक्षा आणि समृद्धीसाठी खूप महत्त्वाची आहेत. 'काश्मीर खोऱ्याचे प्रवेशद्वार' म्हणून ओळखले जाणारे काझीगुंड, दक्षिण काश्मीर आणि पूर्वेकडील प्रदेशांमधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करते. पंपोर, श्रीनगर, सोपोर आणि अनंतनाग ही स्थानके काश्मीर खोऱ्यातील आर्थिक घडामोडींची प्रमुख केंद्रे आहेत. याशिवाय, रियासी आणि कटरा स्थानके माता वैष्णोदेवी मंदिराच्या जवळ असल्याने आध्यात्मिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून देखील महत्त्वाची आहेत.

लवकरच, कटरा ते श्रीनगर ही अत्याधुनिक वंदे भारत ट्रेन यूएसबीआरएल रेल्वे मार्गावर नियमितपणे धावेल, ज्याची आपण सर्व देशवासी आतुरतेने वाट पाहत आहोत! येथे धावणारी वंदे भारत एक्सप्रेस विशेषतः काश्मीरमधील हिवाळा आणि बर्फवृष्टीच्या आव्हानात्मक परिस्थितीत सुरळीत चालण्यासाठी डिझाइन केलेली आहे. आधुनिक सुविधांव्यतिरिक्त, तिच्या प्रगत हीटिंग सिस्टममुळे ट्रेन शून्यापेक्षा कमी तापमानातही आरामदायी आणि सुरक्षित प्रवास अनुभव देते. हिवाळ्यातही स्पष्ट दृश्यमानता सुनिश्चित करण्यासाठी ड्रायव्हरच्या पुढच्या काचेवर हीटिंग उपकरणे देखील बसवलेली आहेत. काश्मीरचे स्वतःचे वंदे भारत जागतिक दर्जाच्या प्रवासासाठी सज्ज आहे. 'काश्मीर ते कन्याकुमारी' पर्यंत भारत नेहमीच एक राहिला आहे. भारतीय रेल्वेचा हा नव्याने बांधलेला रेल्वे मार्ग काश्मीरला अखंड रेल्वे कनेक्टिव्हिटी प्रदान करत आहे, या प्रदेशात वर्षानुवर्षे रखडलेले विकास काम पूर्ण करत आहे, ज्यामुळे संपूर्ण प्रदेश विकासाचे नवे आयाम स्थापित करेल.

काश्मीर खोऱ्याचा पहारेकरी पीर पंजाल, बनिहाल बोगद्यातून जाणाऱ्या रेल्वेच्या चाकांच्या मधुर संगीताची वाट पाहत आहे! खरंच, काश्मीर आता फार दूर नाही!

**- जया वर्मा सिन्हा**

भारतीय रेल्वेचे माजी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

## निवृत्तीच्या काळात आर्थिक स्वावलंबनासाठी नियोजन महत्त्वाचे

पुणे : निवृत्तीसाठी आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे ही एक प्रमुख आकांक्षा आहे, ज्यासाठी काळजीपूर्वक नियोजन आणि शिस्तबद्ध अंमलबजावणी आवश्यक आहे. मात्र ही प्रक्रिया एक लांब प्रवास आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. ,यात अनेक पायऱ्या आणि मजबूत समायोजन समाविष्ट आहेत.

यासंदर्भात माहिती देताना बंधन एएमसीचे सेल्स अँड मार्केटिंग हेड गौरब परिजा म्हणाले की, एखाद्याच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून, स्पष्ट लक्ष्ये निश्चित करणे आणि एक ठोस बचत योजना तयार करणे, हे तुमचे जीवन निवृत्तीनंतर कसे असेल हे ठरविते. सशक्त सेवानिवृत्ती योजनेचे मुख्य उद्दिष्ट केवळ एखाद्याच्या बचत आणि गुंतवणुकीतून जीवनाचा मूलभूत खर्च भागवता येईल, अशा टप्प्यावर पोहोचणे नाही तर त्यापलीकडे जाऊन निवृत्तीनंतरचे जीवन जगणे हा आहे.

गौरब म्हणाले की, निवृत्तीची वर्षे एखाद्याच्या आवडीनुसार, प्रवास करणे आणि आर्थिक चिंतांपासून मुक्त जीवनाचा आनंद लुटण्याचे स्वातंत्र्य काही काळजीपूर्वक नियोजन आणि शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापनाने आवाक्यात येऊ शकते. बचतीसाठी एक उत्तम प्रकारे तयार केलेली योजना म्हणजे केवळ आर्थिक गरजांवरच नव्हे, तर वैयक्तिक इच्छांवर आधारित निवडी करण्यास सक्षम असणे आहे. निवृत्तीचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करणे व ती साध्य करण्यासाठीची पहिली पायरी आहे. तुम्हाला कोणत्या वयात निवृत्त व्हायचे आहे आणि कोणत्या प्रकारची जीवनशैली जगायची आहे, हे लक्षात घेऊन सेवानिवृत्तीमधील आर्थिक स्वातंत्र्याचा तुमच्यासाठी काय अर्थ आहे, हे ठरवणे महत्त्वाचे आहे.

ते म्हणाले की, सेवानिवृत्तीची उद्दिष्टे निश्चित केल्याने तुमचे आर्थिक नियोजन केंद्रित राहण्यास मदत होते. तुम्ही ज्या सेवानिवृत्ती निधीची कल्पना करत आहात, त्यात आरोग्यसेवा आणि दैनंदिन खर्चासारखे निवृत्तीनंतरचे मूलभूत खर्चदेखील विचारात घेतले पाहिजेत. या प्रमुख बाबी लक्षात ठेवल्याने तुम्हाला एक आर्थिक योजना तयार करण्यात मदत होऊ शकते, जी तुम्हाला सेवानिवृत्तीनंतर हवे असलेले जीवन जगण्याची खात्री देते.

कालांतराने चलनवाढीच्या परिणामांमुळे तुमची सेवानिवृत्ती बचत कमी होईल, हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. तुम्हाला महागाईपेक्षा जास्त संभाव्य परताव्यासह वैविध्यपूर्ण गुंतवणूक आणि मालमत्तांमध्ये प्रवेश असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. महागाईचा अंदाज आर्थिक नियोजनाचा भाग म्हणून तुमच्या बचतीचे मूल्य दीर्घकाळ टिकवून ठेवण्यास मदत करतो. अर्थव्यवस्थेतील बदलांशी जुळवून घेण्यासाठी तुमची आर्थिक उद्दिष्टे आणि बजेट वेळोवेळी पुन्हा तपासण्याचीही गरज आहे. तुम्ही जितके चांगले तयार असाल आणि जुळवून घ्याल, तितके तुमचे सेवानिवृत्तीचे उत्पन्न महागाईच्या कमकुवत शक्तींविरूद्ध अधिक संरक्षित असेल, असे परिजा म्हणाले. परिजा यांच्या मते, सेवानिवृत्ती नियोजन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, ज्यासाठी सतत लक्ष आणि बदल आवश्यक असतात. असे केल्याने तुम्ही तुमच्या सेवानिवृत्ती योजनेत निश्चित केलेल्या उद्दिष्टांकडे वेळोवेळी पुनरावलोकने आणि अपडेट्सद्वारे वाटचाल करत राहता. तुमची उद्दिष्टे आणि गुंतवणुकीच्या कामगिरीच्या संदर्भात तुमच्या सध्याच्या आर्थिक स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी वार्षिक पुनरावलोकन करणे महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही जीवनातील कोणत्याही महत्त्वाच्या प्रसंगातून जाता, तेव्हा तुम्हाला तुमच्या सेवानिवृत्तीचे चांगले नियोजन करावे लागते आणि बदलत्या आर्थिक परिस्थिती व तुमच्या गुंतवणुकीतील आवश्यक समायोजने यांच्याशी अद्ययावत राहावे लागते. नियोजनाच्या दिशेने एक गतिमान दृष्टीकोन घेणे आणि स्वतःला तुमच्या गरजा स्पष्टपणे सांगणे, तुम्हाला पुढे जाण्यास आणि सुरक्षित व समाधानकारक सेवानिवृत्तीसाठी मजबूत पाया तयार करण्यात मदत करेल, असे ते शेवटी म्हणाले.

### तीन तासांचा महासंगीत सोहळा, तीन दिवसांचं शूट आणि तेहत्तीस कलाकारांची फौज

## जुळणार नाती अनेक, साजरा होणार सोहळा एक...

### स्टार प्रवाहच्या ठरलं तर मग आणि लग्नानंतर होईलच प्रेम मालिकेच्या महासंगीत सोहळ्यासाठी कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळींची जय्यत तयारी

मालिका आणि त्यातील प्रत्येक पात्र हे प्रेक्षकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत. म्हणूनच तर मालिकेतले सुख-दुःखाचे प्रसंग प्रेक्षकांना आपलेसे वाटतात. मायबाप रसिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी स्टार प्रवाह वाहिनी सदैव तत्पर असते. मनोरंजनाच्या प्रवाहातला असाच एक अनोखा प्रयोग ९ फेब्रुवारीला प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. ठरलं तर मग आणि लग्नानंतर होईलच प्रेम या दोन मालिकांचा महासंगीत सोहळा सलग तीन तास प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. तीन तासांच्या या महासंगीत सोहळ्यात ३३ कलाकारांची फौज दिसणार आहे. अर्जुन, सायली, नंदिनी, पार्थ, जीवा आणि काव्यासह दोन्ही मालिकेतील सर्व मुख्य कलाकार या महासंगीत सोहळ्यात दिसणार आहेत. तीन तासांचा हा अभूतपूर्व सोहळा साकारण्यासाठी १५० पेक्षा जास्त तंज्ञत्र मंडळी तीन दिवस मेहनत घेत होते. शूटिंग वेळेत पूर्ण व्हावं यासाठी दोन हुबेहुब दिसणाऱ्या सेटची निर्मिती करण्यात आली. कलादिग्दर्शक तृप्ती ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे एकसारखे दिसणार दोन सेट उभारले गेले. ठरलं तर मग मालिकेचे दिग्दर्शक सचिन गोखले यांनीच हा तीन तासांचा महासंगीत



कलाकारांसोबत या महासंगीतच्या निमित्ताने पहिल्यांदा काम केलं. प्रत्येक पात्र समजून घेत शूटिंग करत होतो. तीन तासांचा एपिसोड जवळपास तीन दिवस शूट करत होतो. हा अनुभव नक्कीच अविस्मरणीय आहे.

तीन तासांचा हा महासंगीत सोहळा उभा करणं हे सोपं नव्हतं. या आव्हानाविषयी सांगताना स्टार प्रवाहचे बिझनेस हेड सतीश राजवाडे म्हणाले, 'दोन मालिका ज्यांची स्वतंत्र कथानकं सुरु आहेत त्या एकत्र गुंफून त्याची एक गोष्ट बांधणं आणि त्यात तीन तासांचा भक्कम भाग बनवणं आणि ३३ कलाकार असणं हे आव्हानात्मक होतं. स्टार प्रवाहच्या संपूर्ण टीमने मिळून हे पार पाडलं आहे. रसिकांना मनोरंजनाची मेजवानी मिळेल यात काही शंका नाही. जितकी मेहनत करतो तेवढा रसिकांचा प्रतिसाद मिळतो. त्यामुळे असे नवनवे प्रयोग करताना फार आनंद होतो. मात्री खात्री आहे महासंगीत विशेष भाग उत्तम मनोरंजन करेल.'

सलग तीन दिवस महासंगीत सोहळ्याचं शूटिंग सुरु होतं. सेटवर सगळ्या गोष्टी सुरळीत पार पडाव्यात यासाठी निर्माते सोहम आणि सुचित्रा आदेश बांदेकर आवर्जून उपस्थित होते. मालिकेचं कथानक हा मालिकेचा आत्मा असतो. त्यामुळे लेखकाच्या खांद्यावर विशेष जबाबदारी असते. त्यात दोन्ही मालिकांच्या कथेला योग्य न्याय देत कथा बांधणं ही अत्यंत जबाबदारीची गोष्ट. लेखिका शिल्पा नवलकर आणि अश्विनी अंगाळ यांनी या महासंगीत सोहळ्याची कथा अतिशय सुबकतेने गुंफली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद मा. पाटील मॅडम यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९२/२०२५

अर्जदार : रामनाथ रावजी माळी, रा. कोडापुर, पोस्ट सोलेगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदाराचे चे चुलते नामे गजाबा सोनाजी माळी यांचा दि.०३/१२/२०२४ रोजी मौजे कोडापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत गजाबा सोनाजी माळी यांचे आई वडील यापुर्वीच मृत्यु पावले असुन मयत गजाबा सोनाजी माळी यांची पत्नी सुध्दा यापुर्वी मयत झाली आहे. मयत गजाबा सोनाजी माळी यांचे पत्नीला मयत गजाबा सोनाजी माळी यांचे पासुन कोणतेही मुलबाळ व अपत्य झालेले नाहीत. मयत गजाबा सोनाजी माळी यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत गजाबा सोनाजी माळी यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०७/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्र. ९८/२०२५ पु.ता.२५/०३/२०२५

अर्जदार -१) राजू पिता सखाराम गायकवाड वय ६० वर्षे, धंदा मजूरी रा. ई-बिल्डींग, तिरूपती विहार गारखेडा परिसर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद २) विजय पिता सखाराम गायकवाड वय ५७ वर्षे, धंदा मजूरी रा. गोपीनाथ नगर, लासुरगांव रोड हर्सुल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३) आशा भ्र. अशोक भोसले वय ४९ वर्षे, धंदा घरकाम रा. सटाना रोड, आनंदवाडी, मनमाड, ता. नांदगांव जि. नाशिक ४) रेखा भ्र. अनिल गायकवाड वय ५१ वर्षे, धंदा घरकाम रा. गोपीनाथ नगर, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) प्रिती पिता अनिल गायकवाड वय रा. शक्कर भाई मोहल्ला, लासूर स्टेशन, २५ वर्षे, धंदा घरकाम ता. गंगापूर जि. औरंगाबाद ६) प्रतिभा पिता अनिल गायकवाड वय २२ वर्षे, धंदा घरकाम रा. हर्सुल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात अँड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ६ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांचे वडील, अर्जदार क्रं. ४ चे सासरे व अर्जदार क्रं. ५ व ६ यांचे आजोबा नामे सखाराम सुखदेव गायकवाड हे दिनांक ०५/०३/२०१६ रोजी मौजे हर्सुल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई व अर्जदार क्रं. ४ ची सासु आणि अर्जदार क्रं. ५ व ६ यांची आजी नामे सुशलाबाई सखाराम गायकवाड या दिनांक ०३/०७/२०११ रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांचा भाऊ व अर्जदार क्रं. ४ यांचे पती आणि अर्जदार क्रं. ५ व ६ यांचे वडील नामे अनिल सखाराम गायकवाड हे दिनांक ३०/०९/२००८ रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत सखाराम सुखदेव गायकवाड यांना अर्जदार क्र. १ ते ६ हे कायदेशीर वारसदार असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत सखाराम सुखदेव गायकवाड यांच्या मृत्युमूळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक ७/०२/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, ०९ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 'सत्ता आणि पैशाची मस्ती केजरीवालांच्या डोक्यात गेली'

### समाजसेवक अण्णा हजारे यांचे वक्तव्य

अहिल्यानगर : अरविंद केजरीवालांचे विचार, चारित्र्य शुद्ध नाही, म्हणूनच त्यांचा पराभव झाला. त्यांचे जीवन निष्कलंक नव्हते. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील मतदारांचा विश्वास गमावला. मी त्यांना वारंवार सांगितलं, मात्र त्यांनी ऐकलं नाही. केजरीवाल यांनी सुरुवातीला चांगली कामे केली, मात्र सत्ता आणि पैशाची मस्ती त्यांच्या डोक्यात गेली, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.



दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने आपला जोरदार धक्का दिला आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह अनेक जणांचा पराभव झाला. या पार्श्वभूमीवर हजारे माध्यमांशी बोलत होते.


दिल्लीत दारूच्या ठेक्यांच्या माध्यमातून जो आर्थिक घोटाळा झाला, त्यामुळे ते बदनाम झाले. एकीकडे केजरीवाल लोकांच्या चारित्र्याबद्दल बोलतात. मात्र दुसरीकडे दारू ठेक्यांमधे घोटाळे करतात, असं लोकांना वाटायला लागलं, दारूचे मोठ्या प्रमाणात परवाने दिले गेले. त्यामुळे सामान्य नागरिकांनी आता त्यांना नाकारल्याचं दिसत आहे आज जो कौल आपल्याला पाहायला मिळतो आहे तो दारूच्या दुकानांना दिलेली लायसन्स आणि त्यातून मिळालेले पैसे याचा परिणाम असल्याचं हजारे यांनी म्हटलं आहे.

# दिल्लीच्या जनतेने भ्रष्टाचाराचा 'शीशमहल' उद्ध्वस्त केला

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आपवर टीका

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा मोठा पराभव झाला असून, भाजपने ५० जागांवर विजय मिळवत राजधानीत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. आम आदमी पक्षाने केवळ २० जागांवर समाधान मानावे लागले, त्यामुळे तब्बल २७ वर्षांनंतर भाजपने पुन्हा दिल्लीचा किल्ला सर केला. या विजयावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रतिक्रिया देत अरविंद केजरीवाल यांच्यावर जोरदार निशाणा साधला.

शाह यांचा 'आप'वर हल्लाबोल



अमित शाह यांनी एक्सवर पोस्ट करत भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आणि दिल्लीच्या जनतेने भ्रष्टाचाराच्या विरोधात दिलेला कौल स्पष्ट असल्याचे म्हटले.

त्यांनी म्हटले आहे की, दिल्लीच्या हृदयात नरेंद्र मोदी आहेत. दिल्लीच्या जनतेने खोटारडेपणा, धोकेबाजी आणि भ्रष्टाचाराचा 'शीशमहल' उद्ध्वस्त करत आप-दा मुक्त दिल्ली केली आहे. ज्या लोकांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत, अशा लोकांना दिल्लीकरांनी धडा शिकवला.


दिल्ली आता विकासाच्या नव्या पर्वात - शाह

शाह पुढे म्हणाले, दिल्लीमध्ये आता विकास आणि विश्वासाच्या नव्या युगाची सुरुवात झाली आहे. दिल्लीत असत्याच्या सरकारचा शेवट झाला असून, अहंकार आणि अराजकतेचा पराभव झाला आहे. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने विकासाचा व्हिजन दिल्लीत दाखवला आहे आणि त्यावर दिल्लीकरांनी विश्वास ठेवला. या प्रचंड जनादेशाबद्दल दिल्लीच्या जनतेचे मनःपूर्वक आभार. मोदींच्या नेतृत्वातील भाजपाने आपली सर्व आश्वासने पूर्ण करून दिल्लीला देशातील एक नंबर राजधानी बनवण्याचा संकल्प केला आहे, असे शाह म्हणाले.

दिल्लीतील राजकीय समीकरणे बदलणार?

या निकालानंतर दिल्लीच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता असून, पुढील काही दिवसांत भाजपा आणि आपमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३५) प्रार्थना (१)

आशय :- (१) जगाच्या पाठीवर आपल्या देशाला आई म्हणणारा एकमेव देश म्हणजे भारत. भूमी

म्हणजे निव्वळ जमिनीचा तुकडा असतो का? नाही. ती धरती माताआहे. हिंदू संस्कृतीत जो जो आपल्याला उपयुक्त सिद्ध होतो त्यांना आपण देवता समान / मातेसमान मानतो. उदाः - गोमाता भूमाता, गंगामाता, विठू माऊली, ज्ञानेश्वरमाऊली, नदीमाय इत्यादी. या भारत मातेच्या मांडीवर आम्ही सुखाने खेळतो- बागडतो. लहानाचे मोठे होतो. म्हणून आपण उत्तम पर्यावरणासाठी जमीन- हवा- पाणी-वृक्ष-नद्या- समुद्र- पर्वत यांचे रक्षण करणे आवश्यक आहे. पण आम्हां भारतातल्या लोकांना स्वच्छतेची अजिबात सवय नाही. तरीसुद्धा इथे आरोग्य नांदते. ते कसे; कारण स्वच्छ सूर्यप्रकाशाच्या वरदानामुळेच हे शक्य आहे. म्हणून आपण आपल्या बुद्धीला प्रज्वलित करणाऱ्या, तेजस्वी सूर्याला नमस्कार करतो. सूर्याला कर्माचा उद्धारक समजतो. आपल्या भारत मातेजवळ असणारी खनिज संपत्ती, जंगल संपत्ती, सागर किनारा, धनधान्य समृद्धी, पवित्र व शुद्ध वातावरण, नियमित येणारे ऋतू हे सर्व जगण्यासाठी बळ देणारे आहेत. ही वत्सल माता आहे. ऋषीमुनींच्यामुळे ही पुण्यभूमी आहे. म्हणून पुन्हा पुन्हा या मंगल मातेला वंदन करू या. मातृभूमीवर प्रेम करणारे तिला हिंदूभूमी म्हणतात. भारत माता म्हणतात आणि राष्ट्र सर्वप्रथम या न्यायाने म्हणतात

'पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते.'

।। भारत माता की जय ।। क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## लाडकी बहीण योजनेत नवीन निकष नाही



पुणे : लाडकी बहीण योजनेत कोणताही नवीन निकष नाही, काही बहिणी त्या निकषाबाहेर गेल्या असल्याने त्यांनी योजनेचा लाभ घेणे सोडले. आम्ही कोणाचेही पैसे परत घेणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले. तसेच दिल्ली विधानसभेत भाजपला मिळालेले यश म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जनतेने दाखविलेला विश्वास आहे, असे नमूद केले. या विजयाने आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांचा बुरखा फाटला आहे, असेही फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

पुणे दौऱ्यात हिंदू गर्जना केसरी स्पर्धेच्या ठिकाणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली. यावेळी पत्रकार परीषदेत ते बोलत होते. स्पर्धेचे आयोजक धीरज घाटे आणि उद्योजक पुनीत बालन यावेळी उपस्थित होते.

लाडकी बहीण योजनेच्या संदर्भात प्रश्न विचारले असता, फडणवीस म्हणाले, 'आम्ही जनतेच्या पैशाचे कस्टोडीयन आहोत, आम्हालाही महालेखापालांना उत्तर द्यावे लागते. त्यामुळे नियमाच्या बाहेर जर कोणाला फायदा पोहोचत असेल तर तो निश्चित बंद केला जाईल, त्याची आम्ही सुरुवात केली आहे. योजनेसाठी कुठलाही नवीन निकष नाही. योजना घोषित केली त्यावेळेस जे निकष होते. त्या निकषांपेक्षा वेगळं ज्यांनी अर्ज केला त्यांच्यावरच ही कारवाई होते आहे.

## दिल्लीत २७ वर्षांनी भाजपला स्पष्ट बहुमत

### आम आदमी पार्टी सत्तेतून बाहेर गेली, काँग्रेसला ७० पैकी एकही जागा नाही

नवी दिल्ली, ०८ फेब्रुवारी : दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला (भाजप) स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजप ४८ तर आम आदमी पक्ष २२ जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेस सलग तिसऱ्यांदा 'शून्य' वर आल्याचे दिसते. भाजपने १९९३ मध्ये पहिल्यांना दिल्लीच्या निवडणुकीत विजय मिळवला होता. त्यानंतर तब्बल २७ वर्षांनी भाजपला दिल्लीची सत्ता मिळाली आहे.

नवी दिल्लीतून निवडणूक जिंकलेले भाजप नेते प्रवेश वर्मा यांनी ट्विटरवरील (एक्स) पोस्टमध्ये सांगितले की, अंधार दूर झाला आहे, सूर्य उगवला आहे, कमळ फुलले आहे. दिल्लीने विकास निवडला आहे. हा विजय दिल्लीच्या विश्वासाचा आहे, हा विजय दिल्लीच्या भविष्याचा आहे. भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या कठोर परिश्रमाबद्दल आणि दिल्लीतील जनतेच्या विश्वासाबद्दल आभारी आहे. दिल्लीच्या या नवीन पहाट साठी सर्व दिल्लीवासीयांचे अभिनंदन.

आपसाठी अस्तित्वाची लढाई तर भाजपची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट होत आहेत. येथे आपला मोठा हादरा बसला असून तब्बल २७ वर्षांनंतर भाजपने विधानसभेवर सत्ता स्थापन करण्याकडे वाटचाल सुरु केली आहे. निर्णायक बहुमताकडे पक्षाने वाटचाल केल्यामुळे दिल्लीतील भाजप कार्यकर्त्यांनी पक्षाच्या कार्यालयाबाहेर विजयोत्सवाला प्रारंभ झाला आहे.

## नवे प्राप्तीकर विधेयक पुढील आठवड्यात मांडणार - अर्थमंत्री

नवी दिल्ली, ०८ फेब्रुवारी : केंद्र सरकार येत्या आठवड्यात नवे प्राप्तीकर (इन्कम टॅक्स) विधेयक लोकसभेत मांडणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज, शनिवारी याबाबत संकेत दिलेत. आरबीआयच्या संचालक मंडळाशी चर्चे नंतर त्या माध्यमांशी संवाद साधताना बोलत होत्या.

संसदेच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीला संपत आहे. हे सत्र आगामी १० मार्च रोजी पुन्हा सुरू होऊन ४ एप्रिलपर्यंत चालणार आहे. त्यामुळे प्राप्तीकर विधेयक नेमके कधी येणार यासंदर्भात उत्कंठा होती. यापार्श्वभूमीवर सीतारामन म्हणाल्या की, पुढील आठवड्यात प्राप्तीकर विधेयक लोकसभेत मांडले जाईल. त्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठवण्यात येईल असे त्यांनी सांगितले. याबाबत सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि संसदेने ते मंजूर केल्यानंतर नवीन विधेयक कधी लागू करायचे ? यावर सरकार निर्णय घेईल.

नव्या आयकर विधेयकाला नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूरी दिली. अर्थमंत्री सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात नवीन आयकर विधेयकाची घोषणा केली होती. नवीन आयकर विधेयक सहा दशके जुन्या आयकर कायदा १९६१ च्या जागी घेईल. प्रत्यक्ष कर कायद्याची कर व्यवस्था सोपी आणि सुटसुटीत करणे आणि कोणत्याही नवीन कराचा बोजा न लादणे हा या नवीन विधेयकाचा उद्देश आहे.

## टीजेएसबी सहकारी बँकेत गोवा येथील सिटीझन क-ऑपरेटिव्ह बँक विलीन

### दिनांक दहा फेब्रुवारी पासून बँकेच्या सर्व सहा शाखा टीजेएसबी बँकेच्या शाखा म्हणून कार्यरत होणार

ठाणे, दि. ०८ फेब्रुवारी: नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात देशात अग्रणी असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेत गोवा, वास्को दि गामा येथील १९८४ पासून कार्यरत असलेल्या दि सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेचे विलीनकरण झाले आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या पुढाकाराने विलीनकरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या बाबतचे प्रसिद्धी पत्रक भारतीय रिझर्व बँकेने दिनांक सात फेब्रुवारी रोजी आपल्या संकेतस्थळावर प्रसारित केले आहे. विलिनकरणाच्या सर्व नियम आणि अटींची पूर्तता करून झालेल्या प्रक्रियेप्रमाणे सोमवार दिनांक दहा फेब्रुवारी पासून सिटीझन को -ऑपरेटिव्ह बँकेच्या गोवा येथील सर्व सहा शाखा टीजेएसबी सहकारी बँकेच्या शाखा म्हणून कार्यरत होतील. या सर्व सहा शाखातून टीजेएसबीच्या सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ग्राहक सेवा तात्काळ दिल्या जाणार आहेत. या विलीनकरणामुळे टीजेएसबी बँकेच्या एकूण शाखांची संख्या एकशे त्रेचाळीस (१४३) वरून एकशे एकूणपन्नास (१४९) इतकी झाली आहे. तर, गोव्यातील शाखांची संख्या बारा (१२) झाली आहे. टीजेएसबी सहकारी बँकेने विलीन झालेल्या सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेचा सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग सामावून घेतलेला आहे. या विलीनकरणामुळे टीजेएसबी बँकेचा गोव्यातील पाया अधिक सक्षम झाला असून, या विस्तारामुळे टीजेएसबी बँक गोवेकरांना अधिक तत्पर सेवा देईल असे टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी या विलीनकरणाबाबत म्हटले आहे. ही विलीनकरण प्रक्रिया हा सहकाराचा भाग असून यामुळे गोव्यातील सहकारी बँकिंग विस्तारेल असे टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितले. पाच राज्यात कार्यरत असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेची पारदर्शी कार्यपद्धती लक्षात घेऊन भारतीय रिझर्व बँक टीजेएसबीला प्रस्ताव देते. त्यानुसार टीजेएसबी बँक कार्यवाही पूर्ण करते. ग्राहक हित, नागरी सहकारी बँक सक्षमीकरण याला टीजेएसबी प्राधान्य देते, असे शरद गांगल म्हणाले. १९७२ स्थापनेपासून टीजेएसबी सहकारी बँकेने स्व-नियमन करून वैशिष्ट्यपूर्ण कारभार केल्याने गेल्या त्रेपन्न वर्षात एकूण तेवीस हजार कोटीं पर्यंतचा व्यवसाय केला आहे, असेही अध्यक्ष शरद गांगल यांनी नमूद केले.

## धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातून जगद्गुरु महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराजाचे पूजन

### जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने भव्य स्वागत

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी :संतोष करपे. .जगद्गुरू उपाधी पट्टा अभिषेक सोहळा संपन्न झाल्यानंतर वेरूळ येथील श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे ६ फेब्रुवारी रोजी प्रथमच , छत्रपती संभाजीनगर शहरात आगमन झाले. चिकलठाण विमानतळावर जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले त्यानंतर रामनगर, मुकुंदवाडी, चिकलठाणा येथील सर्व भाविकांनी स्वागताचे आयोजन केले होते त्यांचे स्वागत स्वीकारित क्रांती चौक येथे छत्रपती शिवरायांना जगतगुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांनी अभिवादन केले त्यानंतर भव्य पूजन व स्वागत स्थळी संत एकनाथ रंगमंदिर मंदिर येथे आगमन झाले या व्यासपीठावर धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातून महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरीजी महाराजांचे पूजन करण्यात आले.



जय बाबाजी भक्त परिवारातील छत्रपती संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागातील वैजापूर,गंगापूर,कन्नड, पैठण, रत्नपुर, फुलंब्री व पैठण तालुक्यातील भाविक भक्तांसह जळगाव, धुळे आणि नाशिक येथील पदाधिकाऱ्यांनी बाबाजींचे पूजन केले. या मान्यवरांसह उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे तथा पालकमंत्री संजयजी शिरसाट यांचे प्रतिनिधी म्हणून शिवसेना छत्रपती संभाजीनगर जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी बाबाजींचे पूजन करत शुभ आशीर्वाद घेतले.

मराठवाड्यातील प्रसिद्ध गायक प्राध्यापक राजेश सरकटे, ज्येष्ठ विधीतज्ञ ड. विलास धोरडे पाटील, वास्तु विशारद महेश साळुंखे, शिवसंग्राम संघटनेचे किशोर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मच्छिंद्र देवकर पाटील, झुंजार छावा संघटनेचे सुनील कोटकर पाटील, साकला नर्सरीचे संचालक सुरेश शेठ साकला व जागृत हनुमान मंदिर बजाज नगर यांच्यासह अनेक भाविकांनी जगद्गुरु महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांचे पूजन केले.

जगद्गुरू या उपाधीचे हिंदू धर्म आणि अध्यात्मिक जीवन प्रणालीत एक आगळे - वेगळे महत्व आहे. हिंदू धर्माचा विचार प्रचार आणि प्रसार करणाऱ्या अनेक महान संत महंत यांनी या उपाधीला अन्याय साधारण महत्व मिळवून दिले आहे. संत तुकाराम महाराज सारखे संतश्रेष्ठ यांना हा बहुमान वारकरी संप्रदाय आणि वारकऱ्यांनी दिला आहे. अशी हिंदू धर्माची महान परंपरा आणि संतश्रेष्ठ महाराजांच्या नावाने पावन झालेल्या या उपाधीची मानमर्यादा व प्रतिष्ठा जपण्याची ही उपाधी मिळाल्यामुळे मोठी जबाबदारी खांद्यावर आली आहे. संतमहंत यांच्या सस्नेह सहवासातून आणि भाविक भक्तांच्या प्रेमळ भक्तीच्या सानिध्यात ही जबाबदारी पूर्ण विनम्र भावाने पार पाडेल, अशी भावूक उद्गार महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी यावेळी काढले.

महाराष्ट्रातील संत परंपरेतील थोर संत जगद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज श्रीक्षेत्र वेरूळ, तालुका रत्नपुर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे उत्तराधिकारी म्हणून श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी हिंदू धर्माची जप, तप, अनुष्ठान ,श्रमदान ,गोसेवा, गुरुकुल, श्रमदान या परंपरा अतिशय श्रद्धापूर्वक जपल्या आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रचार प्रसारासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर जवळपास १०८ आश्रमाची निर्मिती त्यांनी केली आहे. त्यांच्या या कार्याची विशेष दखल घेऊन श्री. शंभू जुना पंचदशनाम आखाड्याने जगद्गुरु या पदवीने त्यांचा सन्मान केला असल्याने अत्यंत आनंद झाल्याची, भावना स्वामी जनेश्वरानंद महाराज यांनी व्यक्त केली. श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या संभाजीनगरसह राज्यभरातील हिंदू धर्मासाठी व आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या कामकाजाची प्रशंसा करत जिल्ह्यातील विविध सामाजिक प्रश्नांवर घेतलेल्या भूमिकांचा व समाज कल्याणासाठी केलेल्या प्रयत्नांचा ड. विलास धोरडे पाटील, प्राध्यापक राजेश सरकटे व जिल्हाप्रमुख यांनी बाबाजींचे आभार मानले. तसेच, संतश्रेष्ठ महान उपाधी मिळाल्याबद्दल सत्कार करत शुभेच्छा दिल्या.



## अग्रलेख...

# बांगलादेशातील चिंताजनक परिस्थिती

बांगलादेशातील परिस्थिती पूर्ववत् होत आहे, असे वाटत असतानाच बुधवारी रात्री तेथे पुन्हा हिंसाचार उफाळून आला. जमावाने बंगबंधू म्हणून ओळखले जाणारे बांगलादेशचे संस्थापक राष्ट्रपती शेख मुजिबूर रहमान यांचे स्मारक असलेले निवासस्थान बुलडोझरने उडवून दिले. एवढेच नाही, तर सध्या भारतात निर्वासिताचे जीवन जगत असलेल्या बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांचे 'सुधा सदन' हे निवासस्थान तसेच त्यांच्या पक्षाचे कार्यालयही जाळून टाकले. बांगलादेशातील हा घटनाक्रम अराजकाच्या दिशेने जाणारा आहे. शेख हसीना या आपल्या पक्षाच्या युवा आघाडीच्या एका कार्यक्रमाला आभासी पद्धतीने संबोधित करणार होत्या. त्यामुळे शेख हसीना यांच्या राजवटीविरुद्ध जाणीवपूर्वक भडकवण्यात आलेल्या जमावाने बुलडोझर नेत ही कारवाई केली. या घटनेनंतरही शेख हसीना यांनी बुलडोझर चालवून इतिहास मिटवता येत नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली; जी अतिशय मार्मिक म्हणावी लागेल. १९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती आंदोलनाच्या वेळीही आमचे निवासस्थान लुटले होते, पण त्यावेळी त्यांनी निवासस्थान उद्ध्वस्त केले नव्हते; ते पेटवूनही दिले नव्हते, असे त्यांनी म्हटले. भारत सरकारने या घटनेबाबत आपली तीव्र नाराजी बांगलादेशातील अंतरिम सरकारकडे व्यक्त केली. बांगलादेशातील या घटनाक्रमामुळे भारताने चिंतित होणे स्वाभाविक आहे. कारण बांगलादेशात हिंदूंवर तसेच त्यांच्या मंदिरांवर हल्ले करण्यात आले, त्यांची घरे पेटवून देण्यात आली. बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या या अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध भारताने आवाज उठवला. हिंदूंना तसेच हिंदूंच्या मंदिरांना संरक्षण देण्याची मागणी तेथील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्याकडे केली होती. त्याची दखलही त्यांना घ्यावी लागली. शेजारच्या घरात आग लागली, तर त्या आगीचे चटके आजूबाजूच्या घरांना बसतच असतात. भारताची स्थिती आज नेमकी अशीच झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेश अस्थिर झाला आहे. मुळात बांगलादेशात काय सुरू आहे, तेथील लोकांना नेमके काय अपेक्षित आहे, हे कळायला मार्ग नाही. सुरुवातीला बांगलादेशातील नागरिकांचा रोष हा शेख हसीना यांच्या राजवटीवर आहे, असे वाटत होते. पण त्या पदच्युत झाल्यानंतर तसेच बांगलादेशात अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतरही बांगलादेशातील परिस्थिती नियंत्रणात येण्याचे नाव घेत नाही; उलट ती दिवसेंदिवस जास्तच ढासळत चालली आहे. शब्दशः अराजकाची परिस्थिती तेथे निर्माण झाली आहे. १९७१ नंतर पुन्हा एकदा बांगलादेशात अस्थिरता आणि अराजक निर्माण झाले आहे.

भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली आणि पाकिस्तानची फाळणी होत बांगलादेश अस्तित्वात आला, हा पाकिस्तानवर नियतीने उगवलेला सूड म्हटला पाहिजे. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर पाकिस्तानात पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान अशी विभागणी झाली. पश्चिम पाकिस्तानच्या तुलनेत पूर्व पाकिस्तानातील जनतेला भेदभावाची वागणूक मिळू लागली. १९७० मध्ये पाकिस्तानात झालेल्या निवडणुकीत पूर्व पाकिस्तान भागात शेख मुजिबूर रहमान यांनी १६९ पैकी १६७ जागा जिंकल्या. ३१३ सदस्यीय पाकिस्तानी संसदेत सरकार बनवण्यासाठी आवश्यक असलेले बहुमत रहमान यांच्या पक्षाला मिळाले. मात्र, पश्चिम पाकिस्तानातील जनतेला विशेषतः लष्कराला हे मान्य नव्हते. शेख मुजिबूर रहमान यांना सत्तेपासून वंचित ठेवण्याच्या पश्चिम पाकिस्तानच्या कृतीमुळे पूर्व पाकिस्तानात संतप्त भावना निर्माण झाली, लोक रस्त्यावर उतरले. हा जनक्षोभ चिरडून टाकण्यासाठी पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानातील जनतेवर लष्करी कारवाई सुरू केली. तेव्हा पूर्व पाकिस्तानातील जनतेच्या मदतीसाठी भारत धावून गेला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लष्करी कारवाई करत पाकिस्तानचे दोन तुकडे केले आणि नव्या बांगलादेशची निर्मिती केली. बांगलादेशच्या मदतीला भारत तेव्हाही धावून गेला आणि आताही धावून जात आहे. शेख हसीना यांना भारताने आपल्या देशात आश्रय दिला. त्याचे कारण या घटनाक्रमात आहे. मात्र, आज बांगलादेशातील काही गट आपला खरा मित्रपक्ष असलेल्या भारताला दूर लोटत पुन्हा एकदा पाकिस्तानच्या मांडीवर बसण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्या पाकिस्तानने बांगलादेशला जगाच्या नकाशावरून मिटविण्याचा प्रयत्न केला, तोच पाकिस्तान आज बांगलादेशातील अंतरिम सरकारला जवळचा वाटू लागला, हे बांगलादेशातील जनतेचे दुर्दैव म्हटले पाहिजे. बांगलादेशच्या दीर्घकालीन हिताचा विचार केला तर त्याची कृती आत्मघातकी आहे. पण बांगलादेशात आता विवेकी राज्यकर्ते उरले नाहीत. आपले हित कशात आहे, ते त्यांना कळत नाही, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. मोहम्मद युनूस यांना शांततेसाठी नोबल पुरस्कार मिळाला होता, पण तेच युनूस आज बांगलादेशात शांतता प्रस्थापित करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. अंतरिम सरकारचे ते प्रमुख असले, तरी त्यांची स्थिती कळसूत्री बाहुलीसारखी झाली आहे. अंतरिम सरकारमध्ये जमात-ए-इस्लामीचे वर्चस्व आहे. पूर्व पाकिस्तानात तेव्हा एक मोठा वर्ग असा होता, ज्याला बांगलादेशची निर्मिती मान्य नव्हती, त्यांचा ओढा पाकिस्तानात राहण्याकडे होता. अशा लोकांचे नेतृत्व जमात-ए-इस्लामी तेव्हाही करीत होती आणि आताही करीत आहे. शेख हसीना सरकारविरुद्ध विद्यार्थ्यांचे जे आंदोलन झाले, त्याला पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या जमात-ए-इस्लामीची फूस होती, असे म्हणायला हरकत नाही. जमात-ए-इस्लामीच्या बांगलादेश मुक्ती संग्रामातील सहभागाच्या चौकशीचा आदेश शेख हसीना यांनी आपल्या कार्यकाळात दिला होता. जमातच्या काही नेत्यांना फासावरही लटकवले होते. त्यामुळे जमात-ए-इस्लामीचा त्यांच्यावर राग राहणे स्वाभाविक आहे.

बांगलादेशच्या मुक्ती संग्रामात सहभाग घेतलेल्यांच्या कुटुंबीयांना सरकारी नोकरीत आरक्षण देण्याच्या मुद्यावरून बांगलादेशात असंतोष उफाळून आला. त्याची परिणती सध्याच्या हाताबाहेर गेलेल्या परिस्थितीत झाली. बांगलादेशातील उद्योगधंदे बंद पडले आहेत, हजारो लोक बेरोजगार झाले आहेत, महागाई भडकली आहे, लोकांना खायला मिळत नाही; मात्र तरीसुद्धा तेथील राज्यकर्त्यांचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. आज बांगलादेशात जे काही सुरू आहे, ते तेथील समंजस आणि विचारी जनतेला मान्य असेलच असे नाही. पण आज बांगलादेशातच नाही तर जगाच्या सर्व भागांत विचारावर उन्मादी मानसिकतेने ताबा मिळविला आहे. तात्कालिक लाभावर नजर ठेवत देशाच्या दीर्घकालीन नुकसानीचा पाया घातला जात आहे, पण त्यांची खंत कोणालाच वाटत नाही. बांगलादेशमधील परिस्थिती नियंत्रणात आणणे तेथील अंतरिम सरकारला शक्य नाही. जमावी उन्माद आणि भीडतंत्रासमोर पोलिस तर दूरच; तेथील लष्करही अपयशी ठरल्यासारखे दिसत आहे. त्या देशात अशी परिस्थिती दीर्घकाळ राहणे कोणाला विशेषतः भारताला परवडण्यासारखे नाही. त्यामुळे शेख हसीनासारख्या जनतेत लोकप्रिय असलेल्या नेत्याला तेथील अंतरिम सरकारने त्यांच्याविरुद्धचे गुन्हे मागे घेत परत बांगलादेशात बोलवायला पाहिजे. लवकरात लवकर निवडणुका घेत तेथे लोकनिर्वाचित सरकार स्थापन करणे, हाच या समस्येवरचा उपाय वाटतो. बांगलादेश धगधगत राहावा, असे पाकिस्तानला वाटत असले, तरी ते फार काळ शक्य होणार नाही. बांगलादेशातील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी भारताने एकदा हस्तक्षेप केला होता, यावेळी पुन्हा एकदा भारताला हस्तक्षेप करावा लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कारण भारतासमोर खरे आव्हान बांगलादेशचे नाही तर पाकिस्तानचे आहे. बांगलादेशच्या काठीने भारताने पाकिस्तानरूपी साप पुन्हा एकदा मारायला हरकत नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# संजय राऊतांनी असा कोणता मंत्र फुंकला?

पूर्वाश्रमीचे पत्रकार आणि सध्याचे उबाठा गटाचे नेते संजय राऊत हे आपल्या बेताल वक्तव्यांसाठी प्रसिद्ध आहेत. प्रबोधनकार आणि बाळासाहेब ठाकरे यांनी ठाकरी भाषा निर्माण केली; मात्र बाळासाहेबांनंतर तो दरारा, ती ऐट कुणालाच निर्माण करता आली नाही. अधूनमधून राज ठाकरे बाळासाहेबांची आठवण करून देत असतात. पण राज हे प्रत्येक भाषणात आपली भूमिका बदलत असतात. असो. मुद्दा असा की 'ठाकरे शैली' असे शब्द वापरून काहीही बडबडण्याचा परवाना राऊतांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून मिळविलेला दिसतो आहे. मुळात राऊतांच्या तोंडी ठाकरे भाषा शोभत नाही. पण राऊत बातमी निर्माण करतात, यामुळे त्यांचं महत्त्व व कौतुक 'चाय-बिस्कुट' पत्रकारांना फार आहे. सध्या राऊतांचे 'काळी जादू'बद्दलचे विधान कोरोना व्हायरसप्रमाणे पसरत आहे आणि महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या या काळ्या जादूची चर्चा सुरू आहे. संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंवर निशाणा साधण्यासाठी नव्या वादाला जन्म दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शपथ घेतल्यानंतरही वर्षा बंगल्यावर राहायला गेले नाहीत. याचं कारण वर्षा बंगल्यावर काळी जादू केली आहे, तिथे देवीला बळी दिलेल्या रेड्याचे शिंग पुरले आहेत, असा आरोप राऊतांनी केला आहे.

संजय राऊतांच्या या विधानावरून राज्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. शिंदेंच्या शिवसेनेतूनही राऊतांवर पलटवार झाले. त्यांच्या या वक्तव्यावर रामदास कदम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, 'उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, ज्यावेळी उद्धव ठाकरे यांनी 'वर्षा' बंगला सोडला तेव्हा तिथे टोपलीभर निंबू मिळाले. काळी जादू काय ते त्यांना विचारलं पाहिजे. त्यांना त्याचा अनुभव जास्त असेल. म्हणून त्यांच्या डोक्यात हे असं असावं.' गंमत म्हणजे बातमीदारांना चांगलाच मुद्दा मिळाल्याने यावर बरीच चर्चा रंगली. गिरीश कुबेर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मुलाखत घेतली तेव्हा त्यांना हाच प्रश्न केला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, 'काही बाबतीत मीडिया हा वेड्यांचा बाजार झाला आहे. आज मी एका चॅनलवर बघत होतो वर्षा पाडणार? अरे काय वेड्यांचा बाजार आहे? ही कोणाच्या घरची मालमत्ता आहे काय?' मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण देत सांगितलं की, त्यांची मुलगी दहावीला आहे. तिने म्हटलं की परीक्षा झाल्यावर शिफ्ट होऊया. त्यामुळे मुख्यमंत्री वर्षावर राहायला गेले नाहीत. पण राऊतांच्या एका विधानाने किती मूर्खासारख्या बातम्या पेरल्या गेल्या?



संजय राऊत उद्धव ठाकरेंचे खास आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले होते तेव्हा राऊत चाणक्य असल्यासारखे वावरत होते आणि रोज सकाळचा चहा घेताना 'चाय-बिस्कुट' पत्रकारांना आमंत्रण देऊन भयंकर, असंस्कृत, महाराष्ट्राच्या पुरोगामी प्रतिमेला डाग लावणारे, गलिच्छ वक्तव्य करत होते. महिलांबद्दलही ते वाईट बोलायचे. प्रबोधनकार आणि बाळासाहेबांचा वारसा सांगणाऱ्या लोकांकडून अशा गोष्टी होत असतील तर त्यांनी आपल्या घरातले आरसे स्वच्छ करून घ्यायला हवेत. आरसे नसतील तर आरसे बसवले पाहिजेत. कारण राजकारण म्हणजे बेताल बडबड नव्हे. महाराष्ट्राच्या राजकारणाला किती मोठा वारसा लाभलेला आहे. टिळक, सावरकर, आंबेडकर, रानडे, गोखले इत्यादी महान राजकीय नेत्यांनी सुसंस्कृत राजकारणाचा पायंडा पाडून दिला आहे. पण राऊतांसारखे लोक औरंगजेबाचा आदर्श समोर का ठेवतात, हे कळत नाही. औरंगजेब म्हणजे असत्य, गलिच्छपणा, शिवराळपणा इत्यादी. ही काही महाराष्ट्राची संस्कृती नव्हे. राजकारणात शत्रू नसतो, प्रतिस्पर्धी असतो, असं सावरकर म्हणायचे. दादरच्या शिवसेना भवनापासून सावरकर सदन व सावरकर स्मारक हाकेच्या अंतरावर आहे. कधीतरी राऊतांनी तिथे जाऊन डोकं टेकावं. चैत्य भूमीत जाऊन बाबासाहेबांसमोर नरमस्तक व्हावं. पण भिडे गुरुजींसारख्या ऋषितुल्य माणसाला केवळ स्वार्थी राजकारणापोटी दूर करणाऱ्या लोकांकडून आपण काय अपेक्षा करणार आहोत.

संजय राऊत बेतालपणे काळी जादूबद्दल बोलून गेले आणि राज्यभर याबाबत चर्चा रंगली. देशभरात आणि जगभरात महाराष्ट्राची अशी प्रतिमा जात राहिली तर किती वाईट आहे हे! महाराष्ट्र हे साधू-संतांचे राज्य आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, हिंदुसंघटक सावरकर आणि महामानव डॉ. आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रातल्या नेत्यांनी सभ्य वर्तन केलंच पाहिजे. असभ्य वर्तन करणाऱ्या नेत्याला महाराष्ट्रीय म्हणता येणार नाही. कारण महाराष्ट्राची परंपरा समृद्ध आहे. या भूमीत जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या माउलींचा जन्म झाला. अशा भूमीत बेताल बडबड करणाऱ्यांचे महत्त्व ते काय? पण घोर कलियुग असल्याने आणि मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात त्याप्रमाणे मीडिया वेड्यांचा बाजार झाल्याने असल्या विक्षिप्त गोष्टी इथे पोसल्या जातात. राऊतांना काळ्या जादूचे फार आकर्षण आहे, त्यामुळे एक प्रश्न त्यांना विचारावासा वाटतो. उद्धव ठाकरे हे ठाकरे घराण्याचे सुपुत्र आहेत. त्यांचा वारसा खूप मोठा आहे, भव्य आणि दिव्य आहे. त्यांच्याकडे वारसा हक्काने बऱ्याच गोष्टी आल्या होत्या. केवळ पैसाच नव्हे तर वैचारिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक असा वारसा त्यांना काहीही न करता मिळाला. आपल्याकडे अतिशय सामान्य घरातली मुलं मोठी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील सामान्य घरात जन्माला आले. पण स्वकर्तृत्वाने ते आज तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून आले आहेत. त्याउलट उद्धव ठाकरे हे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले, असेच म्हणावे लागेल. मग संजय राऊत ठाकरेंचे खास असतानाही उद्धव ठाकरेंचे सगळे वैचारिक, राजकीय वैभव का हरपले गेले? संजय राऊतांनी असा कोणता मंत्र फुंकला की राजाचा रंक झाला?

प्रबोधनकार ठाकरे आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना वंदन!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# कुटुंब संस्कारांवर मोबाईल वरचढ ठरू नये

जग चहुबाजूंनी होत असलेल्या भौतिक प्रगतीमुळे गतिमान झाले आहे. प्रवास किती दिवसांचा याऐवजी आता किती तासांचा अशी विचारणा अगदी विदेशवारी असेल तरी होते. काही तासांतच जगातील कुठल्याही देशात पोहोचणे शक्य होते इतकी दळणवळण सुविधा अद्ययावत आहे. एवढेच नव्हे, तर शेकडो मैलांवर असलेल्या आप्तांसोबत संवाद साधणारा दूरध्वनीचा १००-१२५ वर्षांचा इतिहास मागे पडून केव्हा भ्रमणध्वनी अर्थात मोबाईल हातात आला ते या प्रगतीच्या गतीत कळलेच नाही. मोबाईलमुळे चालता-फिरता होणाऱ्या संवादाचे अप्रूप संपण्यापूर्वीच अशक्य वाटावा, असा दृश्यसंवाद सहज झाला आहे. सोबतच समाजमाध्यम नावाचे मोठे आभासी जग या क्रांतीमुळे जन्माला आले. परिवर्तन सृष्टीचा नियमच; त्यातही हे परिवर्तन तर प्रगतीची नवनवीन द्वारे खुले करणारे असल्याने त्याचे स्वागतच केले पाहिजे. पण या बदलाचे समाज जीवनावर होणाऱ्या चांगल्या आणि वाईट बाबींचे समीक्षण करण्याची वेळ आता आली आहे. आवश्यक सुविधांसाठी मोबाईल अनेकदा गरजेचा असतो. पण जर मोबाईल मिळाला नाही तर जीवन व्यर्थ आहे, असा समज करून आत्महत्या करण्याइतकी निकड मोबाईलची आहे का, असा प्रश्न पडावा अशा घटना सभोवताल घडत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात असलेले मीनकी हे छोटेसे गाव. या गावात पैलवार कुटुंबीय राहतात. कुटुंबातील ओंकार हा लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे आश्रमशाळेत शिक्षण घेत होता. दहावीत असलेल्या ओंकारची बोर्डाची परीक्षा सुरू होणार होती. त्या आधी त्याने गावी येऊन वडिलांकडे मोबाईलची मागणी केली. शेतीवर उदरनिर्वाह असलेल्या वडिलांना लगेच मोबाईल घेऊन देणे शक्य नव्हते. त्यांनी पैसे नसल्याने आता मोबाईल घेऊ शकत नाही, असे सांगितले. नाराज होऊन ओंकार घरातून बाहेर पडला. दुसऱ्या दिवशी पहाटे वडील राजेंद्र शेती कामासाठी शेतावर पोहोचताच त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. लाडक्या ओंकारने गळफास लावून आत्महत्या केली होती. हे दुःख असह्य झालेल्या राजेंद्र यांनी ओंकारचे कलेवर खाली काढले आणि मुलाने आत्महत्या केलेल्या दोराने स्वतः गळफास लावून जीवन संपविले. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या घटनेनंतर मन सुन्न झाले. ही आणि अशा प्रकारच्या म्हणजेच मोबाईल न मिळाल्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे दिसून येते. कधी नववी, कधी पाचवी तर कधी नुकताच तारुण्यात पदार्पण करणारे अनेक जण केवळ मोबाईल न मिळाल्याने मृत्यूला कवटाळतात. खरंच मोबाईल इतका जीवनावश्यक आहे का? तरुण आणि किशोरवयीन मुलांमध्ये दिसून येणारी ही समस्या नेमकी का उद्भवते, याचा विचार करून त्याचे निरसन करणे आवश्यक आहे. आजकाल सोशल मीड्िया आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीमुळे बालवयापासूनच मुलांना ऑनलाईन राहण्याचा छंद जडला आहे. समाजमाध्यमातून लाईक, कमेंट, फॉलोवर आदी बाबी या वयातील मुलांना प्रतिष्ठेच्या वाटतात. मग आभासी असली, तरी ही 'ऑनलाईन प्रतिष्ठा' मोबाईल न मिळाल्यास धोक्यात आल्यासारखी वाटून त्यातूनच काही जण टोकाचा निर्णय घेतात, असे मानसोपचार तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पण मुळात भारतीय जीवन पद्धती, कुटुंब व्यवस्था, कुटुंब संस्कार ही बलस्थाने असताना उद्भवणारी ही समस्या अधिक क्लेशदायी आहे.

भौतिक प्रगतीच्या गतीमध्ये कुटुंबातून सहज होणारा संस्कार हरवत असल्याची चर्चा नेहमीच होते. यात संयुक्त कुटुंब पद्धतीपासून त्रिकोणी कुटुंबापर्यंतच्या प्रवासात व्यक्तिमत्त्व जडणघडण, जीवनमूल्यांची शिकवण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मनमोकळा होणारा संवाद जवळपास थांबला असल्याची खंत अनेक जण व्यक्त करतात. भौतिक प्रगतीच्या धुंदीत जीवनमूल्यांची शिकवण, संस्कारांची रुजवण आणि कुटुंबातील संवाद याच्या दुर्लक्षाचे दुर्दैवी दृश्य परिणाम वेदनादायी ठरत आहेत. अर्थार्जनासाठी ऊर फाटेस्तोवर धावणे आणि केवळ 'करीअर' हेच जीवन असे पाल्यांच्या मनावर बिंबविणे घातक ठरत आहे. भौतिक प्रगतीची गती सतत वाढत जाणार आहे. मात्र प्रगती कितीही झाली तरी भारतीय जीवनमूल्यांची रुजवण आणि कुटुंबातील सहज मोकळा संवाद याची उपयोगिता कधीही न संपणारी आहे. म्हणूनच प्रत्येक कुटुंबाने पुढच्या पिढीत जीवनमूल्यांची रुजवण आणि मोकळा संवाद साधावा एवढेच.

९४२२८६२८४८

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# ईगल ग्रुप!

महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकीतील पराभव, अपयश, मतदारयादीतील अनियमितता, निवडणूक प्रक्रियेतील गैरव्यवहार आदी विषयांसंदर्भात चौकशी करण्यासाठी काँग्रेस पक्षाने एका 'ईगल ग्रुप'ची स्थापना केली आहे. या ग्रुपचे संचालन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्या नेतृत्वात होणार आहे. हा ग्रुप सर्वांत पहिले महाराष्ट्रात झालेल्या निवडणुकीसंदर्भातील प्रक्रियेची चौकशी करणार आहे. यात नागपूरचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत, मध्यप्रदेशचे माजी मुखमंत्री दिग्विजय सिंह, अजय माकन, अभिषेक मनु सिंघवी, पवन खेडासारख्या लोकांचा समावेश आहे. सदर ग्रुप आपल्या कामाची सुरुवात १० फेब्रुवारीपासून करणार आहे. आता अशा पद्धतीच्या चौकशी समितीची स्थापना करण्याची काँग्रेसला गरज का पडली. आणि समिती स्थापन केलीच आहे म्हटल्यावर त्या समितीचे कार्य सुरू झाल्यानंतर त्यांनी अहवाल दाखल केल्यावर जे तथ्य समोर येईल ते जनतेसमोर आणण्यासाठी पत्रकार परिषद घेणे अपेक्षित असताना, त्याआधीच पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस नेते राहुल गांधींना रडारड करण्याची घाई का झाली असावी?, असा प्रश्न आता या निमित्ताने उपस्थित झाला आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर जवळपास २७ आमदार न्यायालयात गेले असल्याची आकडेवारी समोर आली आहे. आपले आमदार न्यायालयात दाद मागत आहेत, प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे, अद्याप न्यायालयाचा निकाल आलेला नसताना, आपणच बनविलेल्या समितीचा अहवाल आलेला नसताना, सुप्रिया सुळे आणि संजय राऊत यांना सोबत घेऊन हवेत गोळीबार करण्याची लगीनघाई राहुल गांधींना का झाली? हा खरा प्रश्न आहे.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेत महाराष्ट्रातील मतदारांच्या यादीबाबत आणि एकूणच निवडणूक प्रक्रियेसंदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक आयोगाने पादर्शकतेने काम करण्याची गरज असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या लोकसंख्येपेक्षा मतदार जास्त कसे, असा प्रश्नदेखील राहुल गांधींनी उपस्थित केला. हिमाचलप्रदेशच्या लोकसंख्येएवढे मतदार पाच महिन्यांत महाराष्ट्रातील मतदारयादीत वाढले असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी ३९ लाखांची तफावत असल्याचे म्हटले. तर, हाच आरोप राहुल गांधींनी ३ फेब्रुवारी रोजी लोकसभेत बोलताना केला, तेव्हा ७० लाखांची तफावत असल्याचे सांगितले होते. तर, १९ जानेवारी रोजी बोलताना गांधींनी १ कोटी मतदारांची तफावत असल्याचे सांगितले होते. त्यामुळे राहुल गांधी मनाला वाटेल तेव्हा आपल्या मर्जीने आकडे सांगतात हे यावरून सिद्ध होते. राहुल गांधी यांना केवळ आरोप करून संभ्रम निर्माण करायचा आहे. त्यामुळे वाट्टेल तसे बरळत फिरतात. आणि आज तर त्यांच्या होला हो लावताना खासदार सुप्रिया सुळे, संजय राऊत हे देखील दिसले.

यातली गमतीची गोष्ट अशी आहे की, ईव्हीएमवर, निवडणूक प्रक्रियेवर अविश्वास दर्शविण्यासाठी बसलेल्या तीन व्यक्तींपैकी दोन जण अर्थात राहुल गांधी हे रायबरेली आणि वायनाड अशा दोन वेगवेगळ्या मतदारसंघांतून याच ईव्हीएमवर, समान प्रक्रियेद्वारे निवडून आले आहेत. त्यांची बहीणदेखील अलिकडेच पोटनिवडणुकीत मोठ्या मताधिक्याने याच आक्षेप असलेल्या ईव्हीएमवर निवडून आलेली आहे. त्यांच्या बाजूला बसलेल्या सुप्रिया सुळेदेखील याच ईव्हीएमवर निवडून आल्या आहेत. हे दोघे मिळून ज्या महाराष्ट्राच्या निवडणुकीवर वारंवार बोटं उचलत आहेत, त्याच निवडणुकीसोबत नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक झाली त्यात काँग्रेस जिंकली. ही तीच बिचारी अभागी ईव्हीएम होती. जिने एकाचवेळी विधानसभेत हरवलं आणि लोकसभेत जिंकवलं... या निकालावर बोलताना राहुल गांधी कधी दिसले नाही आणि दिसणार नाही. कारण तेथे काँग्रेस जिंकल्यामुळे आपसूक निर्दोषत्वाचा शिक्कामोर्तब झाला, असे म्हणायला हरकत नाही. ज्या महाराष्ट्रात एवढे मतदार आले कुठून असा प्रश्न विचारला जात आहे, त्याच महाराष्ट्रातील नांदेड मतदारसंघात सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीपेक्षा लोकसभेच्या पोटनिवडणुकीत ७ टक्के मतदान वाढले आहे. तेथे काँग्रेसचा उमेदवार निवडून आला, हे कदाचित राहुल गांधींपर्यंत पोहचलेले दिसत नाही.

ईव्हीएमबद्दल म्हणाल तर ते एक स्टॅण्ड अलोन (स्वतंत्र) मशीन आहे. ज्याच्यावर टॅम्परिंग शक्य नाही. ते हॅक करणं शक्य नाही. कारण ते स्टॅण्ड अलोन आहे. कुठल्याही नेटवर्कशी, फ्रिक्वेंशीशी त्याचा काहीही संबंध नाही. ईव्हीएमबद्दलचे जे सगळे प्रोटोकॉल्स आहेत. म्हणजे प्रॉडक्शन ऑफ ईव्हीएमचे प्रोटोकॉल, ट्रान्सपोर्टचे प्रोटोकॉल, स्टोरेजचे प्रोटोकॉल, वापर करण्याचे प्रोटोकॉल, सिक्युरिटीचे प्रोटोकॉल हे सगळे इतके कडक आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यामुळे ईव्हीएममध्ये काही गडबड, गोंधळ, हॅकिंग असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ही प्रक्रिया राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या प्रतिनिधींच्या समक्षच केली जाते आणि त्यांच्या स्वाक्षऱ्या त्यावर असतात. या सर्वांचे चित्रीकरण सुद्धा केलेले असते. म्हणजे थोडक्यात सांगायचं तर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांचा त्यांच्या प्रतिनिधींच्या मार्फत सहभाग हे प्रशासकीय प्रोटोकॉलचं वैशिष्ट्य आहे. टेक्निकली तर ईव्हीएममध्ये गोंधळ होणं किंवा हॅक होणं, टॅम्परिंग होणं हे केवळ अशक्य आहे. जवळपास २४ वर्षांपासून भारतीय जनता गेल्या अनेक निवडणुकांमध्ये यशस्वीपणे ईव्हीएमचा वापर करत आहे. ईव्हीएमद्वारे विविध निवडणुका आतापर्यंत घेण्यात आल्या आहेत. त्या वेगवेगळ्या पद्धतीने यशस्वी झाल्या आहेत. असे असताना विरोधी पक्ष वारंवार आपल्या अपयशाचे खापर ईव्हीएमवर फोडताना दिसतात.

ईव्हीएम, मतदार वाढले, सहा वाजेनंतर मतदान कसे वाढले याचं निवडणूक आयोगानं वारंवार स्पष्टीकरण दिलं आहे. मतदारयादीबाबत आयोगाकडून उत्तरं दिलेली आहेत. आता पुन्हा न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. तेथेही न्यायालयाने उत्तर दाखल करायला सांगितले आहे. न्यायालयाप्रमाणेच निवडणूक आयोग स्वायत्त असल्याने, ते न्यायालयासमोर चुकीची माहिती सादर करणार नाही अशी अपेक्षा आहे. तरीदेखील काही चुकीचं सादर केलंच तर, न्यायालय ते लगेच पकडेल आणि 'दूध का दूध पानी का पानी करेल.' पण यांचा विश्वास निवडणूक आयोगावर नाही, यांचा विश्वास न्यायपालिकांवर देखील नाही. आणि हास्यास्पद बाब म्हणजे स्वतःच निर्माण केलेल्या 'ईगल ग्रुप'वर देखील यांचा विश्वास नाही. तो असता तर 'ईगल ग्रुप'चा अहवाल आल्यानंतर राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेतली असती. पण यावेळी पत्रकार परिषद घेण्याची राहुल गांधींची घाई कदाचित दिल्लीत त्यांचा प्रचंड पराभव होत असल्यानं कव्हर फायरिंगसाठी असावी. कारण आजपर्यंतचा अत्यंत लाजिरवाणा पराभव यावेळी राहुल गांधींच्या नेतृत्वात होत असल्याचा अंदाज त्यांना आला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा दिल्लीचे अपयश ईव्हीएमच्या पदराआड लपवण्याचा हा राहुल गांधींचा प्रयत्न दिसतो. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ''जब एक ही चुटकुला बार-बार सुनाया जाए तो उसपर हंसा नहीं करते...'' अशा किमान शब्दांत कमाल अपमान करून, 'ईगल ग्रुप'चे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेची हवा काढून टाकली, हे मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### सर्वांना राष्ट्रीय अंदाजपत्रक कळते का?

भारतासारख्या देशाचे वर्षांचे अंदाजपत्रक अर्थशास्त्रीय विशेषज्ञ अभ्यास करून व समतोल राखत तयार करत असतात. दरवर्षी असे आढळते की, बजेट लोकसभेत सादर झाल्यावर लगेच काही विरोधी पक्षांचे नेते त्यावर त्यांच्या प्रतिक्रिया देतात. नेहमीच्या ठरलेल्या प्रतिक्रियांच्या तुणतुण्यांशिवाय त्यात विशेष काही नसते. बऱ्याच विरोधी प्रतिक्रियेतून त्या नेत्यांचे अज्ञानच दिसून येते. जसे रुपयाचे अवमूल्यन झाले की देश बुडीत निघाला, असे बऱ्याच जणांना वाटते. उलट एखाद्या देशाच्या चलनाचे अवमूल्यन झाले की त्या देशाच्या निर्यातदारांना फायदा होतो, निर्यात वाढते, परकी चलनात वाढ व्हायला मदत होते. देश स्वतःहून अवमूल्यन करतात. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना चीनने त्यांच्या चलनाचे अवमूल्यन केले होते; ज्यामुळे चीनच्या वस्तू जगात स्वस्त झाल्या होत्या. अमेरिकेने चीनच्या या कृतीचा निषेध केला होता, हे बऱ्याच वाचकांना आठवत असेल. बजेटचा बरा-वाईट परिणाम कळायला काही काळ जावा लागतो. त्यामुळे ताबडतोब बऱ्या-वाईट प्रतिक्रिया देताना अभ्यास व संयम करावा; जेणेकरून सर्वसामान्य जनतेची दिशाभूल होणार नाही. याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी.



**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

### १४४ वर्षांनंतर होणाऱ्या महाकुंभाचे महत्त्व

१४४ वर्षांनंतर होणाऱ्या महाकुंभ मेळ्याचे आध्यात्मिक महत्त्व काय आहे? तसेच या पर्वात गंगेत स्नानाचे काय महत्त्व आहे, हे जाणून घेणे गरजेचे आहे.

**खगोलीय घटना** : १४४ वर्षांनंतर होणाऱ्या कुंभमेळ्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे यावेळी अनेक ग्रहांचा विशेष योग जुळून येतो. शनि ग्रह स्वतःच्या राशीत, गुरू ग्रह कुंभ राशीत आणि सूर्य मकर राशीत प्रवेश करत आहे, ज्यामुळे 'महायोग' तयार होतो. हा महायोग अत्यंत शुभ मानला जातो आणि यामुळे कुंभमेळ्याचे महत्त्व अनेक पटींनी वाढते.

**आध्यात्मिक महत्त्व** : कुंभमेळा हा एक अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक महत्त्व असलेला उत्सव आहे. या काळात गंगा नदीमध्ये स्नान करणे अत्यंत पुण्यदायी समजले जाते. १४४ वर्षांनंतर येणाऱ्या कुंभमेळ्यात स्नान केल्याने व्यक्तीच्या सर्व पापांचे नाश होतात आणि मोक्षप्राप्ती होते, अशी मान्यता आहे.

**ऐतिहासिक महत्त्व** : हा कुंभमेळा ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्वाचा आहे. यापूर्वी असा योग अनेक वर्षांपूर्वी आला होता. त्यामुळे यावेळेचा कुंभमेळा एक ऐतिहासिक पर्वणी आहे, असे मानले जाते. कुंभमेळ्यामध्ये गंगेत स्नान करणे हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. यासोबतच, गंगेत स्नान केल्याने



व्यक्तीच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यालाही लाभ होतो.

**निष्कर्ष** : १४४ वर्षांनी होणारा कुंभमेळा एक अत्यंत दुर्मिळ आणि महत्त्वाचा योग आहे. या पर्वात गंगेत स्नान करणे अत्यंत पुण्यदायी आहे आणि यामुळे व्यक्तीला आध्यात्मिक लाभ मिळतो अशी मान्यता आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

●● ●●

### वस्त्रसंहितेचा निर्णय भक्तांच्या सन्मानासाठीच

श्री सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाने लागू केलेल्या वस्त्रसंहितेच्या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत आणि अभिनंदन. हा निर्णय मंदिराचे पावित्र्य राखणारा आणि भक्तांमध्ये भक्तिभाव निर्माण करणारा, तसेच भारतीय संस्कृतीचे जतन करणारा आहे. मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून, भारतीय संस्कृती आणि परंपरेचे केंद्र आहे. त्यामुळे तेथील पावित्र्य राखले जाणे आवश्यक आहे. मंदिराने घेतलेला हा निर्णय मंदिर परिसरातील भक्तिमय वातावरण अधिक शुद्ध व शिस्तबद्ध ठेवण्यासाठी महत्त्वाचा आहे. शाळा, न्यायालय, विधानभवन, इतकेच नव्हे, तर आजकाल अनेक खाजगी कार्यालये, रुग्णालये, सोनाराची दुकाने, मॉल्स यासारख्या ठिकाणी विशिष्ट पोशाख संदर्भात नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. विविध पंथांतील प्रार्थना स्थळी जाताना तेथील परंपरेनुसार पोशाख घालूनच प्रवेश मिळतो. मग हिंदू मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू होताच याविषयी आक्षेप घेतले जातात, हे खेदजनक आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः अनेक धार्मिक स्थळांमध्ये तेथील वस्त्रसंहितेचे पालन करतात. त्यामुळे सामान्य भाविकांनाही या नियमांचे पालन करण्यात कोणतीही अडचण वाटू नये. उज्जैनच्या श्री महाकालेश्वर मंदिरासह देशातील अनेक प्रसिद्ध मंदिरांमध्ये अशी वस्त्रसंहिता लागू आहे. त्यामुळे श्री सिद्धिविनायक मंदिराच्या निर्णयाचा आदर्श सरकारीकरण झालेल्या सर्वच मंदिरांनी घ्यावा. हे देखील सत्य आहे की, मंदिरातील वस्त्रसंहिता ही कोणावरही अन्याय करणारी नाही. मंदिर प्रशासनाने घेतलेला हा निर्णय योग्यच असून, भाविकांनी त्यास संपूर्ण पाठिंबा द्यायला हवा आणि याविषयी चुकीचे विचार पसरवणाऱ्यांना सनदशीर मार्गाने उत्तर द्यायला हवे.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## बेटर हाफ

**सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२**

# सुंदर पिचाईंची सुंदर, साधी प्रेमकथा



गुगल आणि अल्फाबेटचे सीईओ सुंदर पिचाई आज संपूर्ण जगात प्रख्यात आहेत. भारतीय वंशाचे सुंदर पिचाई जगातील सर्वोच्च सीईओंपैकी आहेत ज्यांना अब्जावधी रुपये पगार मिळतो. आज कोट्यवधींच्या संपत्तीचे मालक सुंदर पिचाई यांचे सुरुवातीचे आयुष्य खूप संघर्षमय होते आणि ते एखाद्या बॉलिवूड चित्रपटापेक्षा कमी नाही. एक काळ असा होता की सुंदर पिचाई यांना भारतातून अमेरिकेला जाण्यासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता, मात्र, आज त्यांच्याकडे इतकी आहे, की ते केवळ विमानाचे तिकीटच नाही तर विमान खरेदी करू शकतात.

पिचाई यांना अमेरिकेत भारतातील प्रतिष्ठेच्या पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना भारत सरकारने वर्ष २०२२ साठी व्यापार आणि उद्योग श्रेणीसाठी दिला आहे. आज ते ज्या स्थानी पोहोचले आहेत तिथे पोहोचण्यासाठी सर्व अडचणींवर मात केल्याचे त्यांनी सांगितले. त्याने सांगितले की जेव्हा त्यांनी अमेरिकेत अभ्यासासाठी येण्याचा निर्णय घेतला तेव्हा ते सोपे नव्हते. त्यावेळी वडिलांचा एक वर्षाचा पगार देऊन मला तिकीट काढावे लागले.

### चेन्नई येथे झाला जन्म

पिचाई यांनी २०१९ मध्ये गूगल आणि अल्फाबेट कंपनीचे सीईओ पद सांभाळले. अल्फाबेट ही गुगलची मूळ कंपनी आहे. भारतीय वंशाच्या पिचाई यांचा जन्म १२ जुलै १९७२ रोजी चेन्नई येथे झाला. तर त्यांनी सुरुवातीचे शिक्षण भारतातच केले. आयआयटी खडगपूरमधून अभियांत्रिकी केल्यानंतर त्यांनी व्हार्टन बिझनेस स्कूलमधून एमबीए शिक्षण पूर्ण केले. तर पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठात गेले. तेथे त्यांनी मेटलर्जिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले. अमेरिकेत राहताना त्यांना खूप संघर्ष करावा लागला. तिथला खर्च भागवणे खूप अवघड होते.

### पहिल्यांदा अमेरिकेत पाहिला संगणक

आज पिचाई जगातील सर्वात मोठ्या टेक कंपनीचे प्रमुख असले तरी अजूनही त्यांचे पाय जमिनीवर आहेत. त्यांचे जुने दिवस, संघर्ष आणि बालपण ते कधीच विसरले नाही. त्यामुळे त्यांना पुढे जाण्याची ऊर्जा मिळते. त्याने पुढे सांगितले की जेव्हा ते अमेरिकेत आले होते तेव्हा आयएसडी कॉलचे शुल्क प्रति मिनिट २ डॉलर होते. खर्च जास्त असल्याने त्यांना घरच्यांशी जास्त वेळ बोलता येत नव्हते. आयुष्यात पहिल्यांदा पिचाई यांनी पहिला संगणक पाहिला. आज पिचाई हे जगातील सर्वात महागडे सीईओ आहे. सुंदर पिचाई यांची एकूण संपत्ती अंदाजे १३१० दशलक्ष डॉलर म्हणजे सुमारे १०,८१० कोटी रुपये आहे. सुंदर पिचाई यांची निव्वळ संपत्ती दरवर्षी वाढते. पिचाई यांचा वार्षिक पगार २४२ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच १,८८० कोटी रुपये आहे. त्याच वेळी, त्यांना दरमहा सुमारे २० दशलक्ष डॉलर पगार मिळतो, जो जगातील सर्वात मोठ्या पगारांपैकी एक आहे.

सुंदर पिचाई अतिशय सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. त्यांचे लहानपण अशा वातावरणात गेले जेव्हा घरी टीव्ही नव्हता किंवा कार वगैरे वाहनदेखील नव्हते. याच कारणाने सुंदर यांच्यासाठी आजही मिळवलेल्या प्रत्येक वस्तूची किंमत मोठी आहे. ते पैशाचे मोल जाणून आहेत. त्यांचा हाच स्वभाव अंजली यांना भावला. पिचाई यांचा साधेपणा आणि पाय जमिनीवर असण्याचा स्वभाव दोघांना जवळ आणण्यास कारणीभूत ठरला. आज जगातील धनाढ्य सीईओंपैकी एक असूनही पिचाई अतिशय साधेपणाने राहतात. कुटुंबाला पुरेसा वेळ देतात आणि वागण्यातही तितकाच साधेपणा त्यांनी जपला आहे.

### पिचाईंची फिल्मी प्रेमकहाणी

सुंदर पिचाई यांच्या पत्नीचे नाव अंजली असून त्यादेखील आयआयटी खडगपूर येथील विद्यार्थिनी आहेत. सुंदर पिचाई नेहमी म्हणतात की, आयआयटी खडगपूरविषयी कायम मला एक जिव्हाळा आहे. कारण येथेच माझी अंजलीसोबत भेट झाली आणि आमचे प्रेम झाले. त्यावेळी सुंदर मेटलर्जिकल अभियांत्रिकीची पदवी घेत होते. सुंदर आणि अंजली एकाच ग्रुपमध्ये होते आणि वर्गमित्रही होते. प्रथम त्यांच्यात केवळ मैत्री होती. मात्र, पाहता पाहता ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनाही एकमेकांची अक्षरशः सवय झाली होती.

यातूनच दोघांमधील प्रेमभावना वाढीस लागली. अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षी सुंदर यांनी अंजलीला प्रपोज केले आणि तिने तो स्वीकारलादेखील. सुंदर पिचाई यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, स्मार्टफोन नसलेल्या जमान्यात डेट करणे आम्हा दोघांसाठी अतिशय कठीण होते.

तिथून आपले पुढील शिक्षण घेण्यासाठी सुंदर पिचाई अमेरिकेत गेले. त्यामुळे दोघांचा लग्नाचा निर्णय होऊ शकत नव्हता. या दरम्यान सहा महिन्यांपर्यंत एकमेकांशी बोललेदेखील नाही. असे असूनही त्यांचे नाते कमकुवत झाले नाही. उलट, या 'लंबी जुदाई'ने त्यांना आणखी जवळ आणले. सुंदर इतके संभावित व्यक्ती होते की, अंजलीला प्रपोज करण्याआधी सुंदर पिचाईंनी अंजलीच्या माता-पित्यांची परवानगी घेतली होती. अर्थातच, त्यांनी परवानगी दिली आणि दोघांचा विवाह संपन्न झाला. त्यांना काव्या आणि किरण अशी दोन अपत्ये आहेत. अंजली स्वतःदेखील यशस्वी प्रोफेशनल आहेत.

मुळात, सुंदर पिचाई अतिशय सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. त्यांचे लहानपण अशा वातावरणात गेले जेव्हा घरी टीव्ही नव्हता किंवा कार वगैरे वाहनदेखील नव्हते. याच कारणाने सुंदर यांच्यासाठी आजही मिळवलेल्या प्रत्येक वस्तूची किंमत मोठी आहे. ते पैशाचे मोल जाणून आहेत. त्यांचा हाच स्वभाव अंजली यांना भावला. पिचाई यांचा साधेपणा आणि पाय जमिनीवर असण्याचा स्वभाव दोघांना जवळ आणण्यास कारणीभूत ठरला. आज जगातील धनाढ्य सीईओंपैकी एक असूनही पिचाई अतिशय साधेपणाने राहतात. कुटुंबाला पुरेसा वेळ देतात आणि वागण्यातही तितकाच साधेपणा त्यांनी जपला आहे. नव्या पिढीने त्यांचा केवळ पद आणि वेतन पाहण्यापेक्षा त्यांच्यातील साधेपणा आणि सच्चेपणा अंगिकारला तर आज आहेत त्यापेक्षा जास्त भारतीय जगभरातील उच्च पदांवर विराजमान दिसतील. आपल्या या जोडीतील जोडीदार आजही एकमेकांना म्हणत असतील....

***तेरी मुस्कुराहट, तेरी सादगी अच्छी लगती है,***
***तेरा ख्याल, तेरी यादें अच्छी लगती है,***
***तू दे अब शिक़ायत या दे अपनी चाहत,***
***अब तेरी सारी बातें अच्छी सी लगती हैं,***
***धड़कता है दिल जिस दिन तेरे नाम से,***
***उस दिन से हमें अपनी धड़कने अच्छी लगती हैं !!***

## रानभाज्यांच्या जगात

**संगीता ठलाल/७८२१८१६४८५**

# पोषक झुळींग!



आपल्या पृथ्वीवर विविध प्रकारच्या वनस्पती-फळं, विविध प्रकारच्या भाज्या, कंदमुळं तसेच अनेक प्रकारच्या गुणकारी फुलं, शेंगा आहेत. मग ते रानातील असो, शेतात पिकणारं असो किंवा घरी लावलेलं असो हे सर्व आरोग्यासाठी लाभदायक असतात. पण, जे निसर्गाच्या सान्निध्यात राहून त्यावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही किंवा त्यांना खतपाणी दिलं जात नाही अशा भाज्या,फळं, फुलं किंवा कडधान्य हे आरोग्याला अतिशय लाभदायक ठरतात. शरीराला अतिशय पोषक असलेलं असं एक विशेष कडधान्य ज्याला झाडीबोलीत 'झुळींग' या नावाने ओळखले जाते. हे कडधान्य आपल्या गडचिरोली जिल्ह्यात जास्त प्रमाणात मिळत असे. आजही काही शेतात या धान्याचं पीक घेतले जाते. त्याला पिवळे मूगसुद्धा म्हणतात.

झुळींग नावाचे हे कडधान्य शरीरासाठी अतिशय लाभदायक आहे. झुळींगचे पीक हाती यायला ४ ते ५ महिने लागतात. जेव्हा मृग नक्षत्राचा पाऊस पडतो आणि शेतावरच्या धुऱ्याच्या पारावर तूर लागवड केली जाते. त्याच पारावर या झुळींगची दोन-तीन दाणे टाकून लागवड केली जाते. झुळींगाची लागवड करताना कीटकनाशक किंवा मीठ वगैरे लावले जात नाही तर साधेच दाणे लावले जातात. झुळींगाची पानं मुगाच्या पानासारखे असतात पण, त्याला मातीचं जास्त पोषण मिळाल्यावर पानं मोठीही होतात. या झुळींग कडधान्याचे झाड नसून त्याचे वेल असतात. हा वेल पारावर जास्त पसरतो किंवा तुरीच्या झाडावर त्याचे वेल जातात. झुळींगाला लहान पिवळी फुलं येतात. या कडधान्यावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही आणि खतपाणीही दिले जात नाही. या वेलाला मुगासारख्या लांब शेंगा असतात. शेंगा थोड्या जाड असतात आणि दाण्यांचा आकारही मुगापेक्षा थोडा मोठा असतो. या शेंगांचे झोके बहुसंख्येने लागतात. या शेंगा डिसेंबर महिन्यात पिवळसर रंगाच्या झाल्या की, हाताने तोडतात. थोडे जास्त वाळल्यानंतर शेंगा टिचकून दाणे खाली पडतात. त्या शेंगा अंगणात वाळत घालतात व काठीच्या साह्याने त्याला ठेचतात. नंतर सुपाने पाखडून दाणे स्वच्छ केले जातात. झुळींगाची उसळ केली जाते. तसेच, त्या दाण्यांना जात्यावर दळून त्याचे वडे बनवितात. झुळींगांची डाळ शिजल्यावर त्यात दोन गावराणी वांगी टाकून, घट्ट फोडणीचे वरण करतात. त्याला झाडीबोलीत झुळींगाचे डाळवांगे म्हणतात.

झुळींगाचे वडे बनविण्याची पद्धत सोपी आहे. आधी त्या दळलेल्या डाळीला दोन तास भिजवतात. नंतर पाट्यावर ती डाळ हलकी वाटून त्यात तांदळाचे पीठ, जिरं, गरम मसाला, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, बारीक चिरलेले तीन कांदे, तिखट, मीठ, हळद, कढीपत्ता आणि कोंथिबिर बारीक चिरून टाकतात. नंतर, त्यात एक कप पाणी घालून एकजीव करतात. नंतर, पातेल्यात तेल चांगलं तापल्यावर मिश्रणाचे लहान वडे करून सोडले जाते. या कुरकुरीत आणि चविष्ट वड्यांचा इतका सुगंध येतो की, तोंडाला पाणी सुटतं. झुळींगाची उसळ फारच पोषक असते. चुलीवर पातेल्यात पाणी ठेवून वीस मिनिटे कडधान्य शिजवतात किंवा कुकरमध्ये थोडे पाणी घालून पाच शिट्या येईपर्यंत शिजवून घेतात. थंड झाल्यावर ते शिजलेले झुळींग काढून थोडंसं तेल घालून नंतर जिरं, मोहरी आणि कांद्याची खमंग फोडणी दिली जाते. सोबतच, वाटलेलं आलंलसूण, एक टोमॅटो, तीन हिरव्या मिरच्या, तिखट-मीठ आणि हळद टाकतात. मिश्रण शिजल्यानंतर त्यात शिजलेले झुळींग घालून परतवून घेतात. थोडे पाणी घालून शिजवून घेतात. एक उकळी आल्यावर कोथिंबिर टाकून एकजीव केले जाते, त्यालाच उसळ म्हणतात. भात आणि भाकरीसोबत उसळ आवडीने खाल्ले जाते. या उसळीचा रंग लाल दिसतो व फार सुगंध येतो. जाणकार सांगतात की, झुळींगाची उसळ लहान मुलांना जास्त प्रमाणात खाऊ घालावी कारण ती शरीराला ताकद देते. अलिकडे अशा पौष्टिक आहाराकडे कोणी लक्ष देत नाही त्यामुळे, आरोग्य बिघडते. निसर्गाच्या सान्निध्यात राहून जास्त प्रमाणात पिकणाऱ्या अशा कडधान्यांची लागवड करणं गरजेचं आहे.

# खाऊचे पैसे

**स्वाती देशपांडे /८३८०८३५४०३**



पैशाचा सदुपयोग केला म्हणून, घरात सगळ्यांनी त्याचं कौतुक केलं.आमचे आजोबा चुकूनही लहान मुलांच्या हातात खाऊ देत नसत. एकदा माहेरी आलेल्या आत्याची मुलं जायला निघाली. आत्या म्हणाली,'चला सगळ्या मोठ्या माणसांना नमस्कार करा. आत्याच्या लहान सहा वर्षांच्या मुलाने आजोबांना नमस्कार केला आणि म्हणाला,'आजोबा, काहीतरी खाऊ द्या ना, नाहीतर घरी गेल्यावर बाबा म्हणतील, काय कंजूस आहे! दोन रूपये देखील मुलांच्या हातावर ठेवत नाही.'
सगळे खूप हसले आणि आजोबांनी मग खिशातून काढून पाच रूपये त्याला दिले. आता मात्र खाऊची रक्कम पाच रूपयांऐवजी पाचशे झालीय बरं का!

कुठल्याशा लग्नात मावशीने मला खाऊ दिला, थोडाथोडका नाही तर पाचशे रूपये! मी म्हणाले,'अगं मावशी, माझी मुलं कॉलेजमध्ये जायला लागली आणि तू आत्ता खाऊ देतेस. मी फ्रॉकमध्ये असताना तर तू कधीच खाऊ दिला नाहीस. तर म्हणाली,'अगं, तुझे काका असताना माझ्या हातात कुठे पैसा होता. तू लहान असताना मला खूप वाटायचं की, बहिणीच्या मुलीला काहीतरी खाऊ-खेळणी द्यावी. तुला काय करायचेत पैसे? म्हणून तुझे काका कधीच पैसे देत नसत. आता काका वारले. त्यांची अर्धी पेन्शन मला मिळते म्हणून, राहीलेल्या इच्छा पूर्ण करून घेते.' मावशीचे जीवनसाथी गेल्याचं दुःख तर नक्की असणारच ना! पण, आता हातात पैसा येतोय, याचा आनंद असेल का? खरंच...कशा जगल्या असतील या बायका? आणि पुरूषांचा पण हा असला विचार! खरं तर घरचा स्वयंपाक, धुणी-भांडी, झाडू-पोछा, वर्षाचे तिखट-हळद, पापड-लोणची सगळंच घरकाम करणाऱ्या या बायकांचा नवऱ्याच्या कमाईत काहीच हिस्सा नसावा का? काही बायका याबाबतीत खमक्या असतात.

आमच्या कार्यालयात एक चपराशी होता. तो दर महिन्याला पे स्लीप मिळाली की, माझ्याकडून त्यावरील आकडे बदलवून घ्यायचा. जसे २६,०००/- असले तर ते २०,०००/- करायचे. मी विचारायचे, हे असं का करतोस रे? तर तो म्हणायचा,'माझ्यावाली बायको शिकेल हाय. तिले लिवता वाचता येते. ती पे सलीप पायते अन् सारे पैसे मांगते. आता सांगा मॅडम मीच कमावतो अन् मले खर्च करायचे असेल तर, काय हिले रोज मागू का? माझ्यापाशी काहीच पैसै नको का? मी हसायचे अन् बदल करून द्यायचे. कधीकधी मी त्याला हसून म्हणायचे, 'तुझी बायको भेटली होती' तर तो लगेच घाबरून म्हणायचा,'तिले पे स्लीपचं गणित नको सांग जा.' हे असंही कुठेकुठे बघायला मिळतं.

आमच्या शेजारच्या काकी तशा खासच! काकांचे कपडे धुण्यासाठी घेत अन् त्यात सापडलेले पैसे मात्र परत काकांकडे कधीच जात नसत. काकींना लोकर खरेदी करून त्याचे स्वेटर विणायचे असायचे किंवा काही क्रिम-पावडर वगैरे खरेदी करायची असायची. काकांनी विचारलं, पैसे कुठून आणले तर काकी चक्क सांगून टाकत की, मुलांच्या पिग्गी बॅंकमधून घेतले.

लहानपणीच हातात पैसे दिले तर मुले बिघडतात असं आई म्हणायची. लहानपणी घरात येणारे पाहुणे २-५ रूपये खाऊसाठी देत. आम्हा बहीणभावांना आईने पिग्गी बॅंक आणून दिल्या होत्या. त्यात ते पैसे टाकायचे. त्यातून जर काही वस्तू आणायची असेल तर, आईला विचारूनच आणायची. शाळेजवळ चिंचा उकडलेले बोरं वगैरे मिळायचं. पण, तसल्या उघड्यावरच्या वस्तू खाल्ल्या की, आजार होतात म्हणून आईशप्पथ, आजपर्यंत चिंचा-बोरं खाल्ली नाहीत. आता घरातच बोरं उकडून मीठ साखर घालून खाते.

एकदा आमचा लहान भाऊ पाचव्या वर्गात असेल, त्याने त्याच्या पिग्गी बॅंकमधून पैसे काढून, आम्हा बहीणींसाठी राखी पौर्णिमेनिमित्त सरप्राइज गिफ्ट आणले होते.

पैशाचा सदुपयोग केला म्हणून, घरात सगळ्यांनी त्याचं कौतुक केलं.आमचे आजोबा चुकूनही लहान मुलांच्या हातात खाऊ देत नसत. एकदा माहेरी आलेल्या आत्याची मुलं जायला निघाली. आत्या म्हणाली,'चला सगळ्या मोठ्या माणसांना नमस्कार करा. आत्याच्या लहान सहा वर्षांच्या मुलाने आजोबांना नमस्कार केला आणि म्हणाला,'आजोबा, काहीतरी खाऊ द्या ना, नाहीतर घरी गेल्यावर बाबा म्हणतील, काय कंजूस आहे! दोन रूपये देखील मुलांच्या हातावर ठेवत नाही.'

सगळे खूप हसले आणि आजोबांनी मग खिशातून काढून पाच रूपये त्याला दिले. आता मात्र खाऊची रक्कम पाच रूपयांऐवजी पाचशे झालीय बरं का! सो...लहान मुलांना खाऊ देत चला. त्याचा काय उपयोग करायचा हे त्यांच्या मातोश्रीच ठरवतील.

## आठवणींच्या पारावर

**मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२**

# विषय मोठा... पुस्तक लहान!



पूर्वी माध्यमिक शाळेत सामाजिकशास्त्र हा एक शंभर गुणांचा पेपर असायचा. त्यात अनुक्रमे इतिहास चाळीस गुण, भूगोल चाळीस गुण आणि नागरिकशास्त्र या विषयाला उर्वरित वीस गुण असे तीन विषय समाविष्ट होते. त्यानंतर, हिंदी, मराठी आणि इंग्रजी अशा तीन भाषा, बीजगणित, भूमिती ही दोन गणिताची पुस्तके आणि जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र अशी तीन विज्ञान विषयावरील पुस्तके होती.

त्यात सर्वात लहान आकाराचे म्हणजे केवळ आठ-दहा पानांचे नागरिकशास्त्र (सिव्हिक्स) नावाचे एक छोटेखानी पुस्तक असायचे. मुळात दैनंदिन जीवनाशी संबंधित असा हा एक स्वतंत्र विस्तृत विषय कायद्याचे शिक्षणात अंतर्भूत आहे. कायद्याचे शिक्षण हे नागरिकशास्त्रच आहे. इतका मोठा आशय व्यापक हा विषय असताना त्याचे पुस्तक आकारमानाने सर्वात लहान का? व्यवहारात अंकगणिताची अरिथमॅटीक्सची गरज वरचेवर भासते. पण तो विषय 'नहीं के बराबर' झालाय! यात काळ-काम-वेग, अपूर्णांक, जमा-खर्च, नफा-तोटा, चक्रवाढ-व्याज, गुणोत्तर प्रमाण इत्यादी ज्या बाबींचा दैनंदिन व्यवहारात उपयोग होतो, असे हे गणित होते. पण अंकगणिताचे स्थान बीजगणितापुढे नगण्य का ? ज्यांना हवं ते तो विषय उच्च शिक्षणात निवडतील की! जीवनावश्यक शिक्षण एका बाजूला सारून काय साध्य होणार?

आपण बॅंकेत, पोस्टात, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड आणि विमानतळावर जातो. बाजारहाट करतो, वीज मंडळ, रजिस्ट्रार ऑफिस, दवाखाना, मॉल, थिएटर आणि बागेत जातो. पण, ट्रिग्नोमेट्री मेट्रायसेस, बीजगणित, भूमिती आणि केमिकल इक्वेशन बॅलन्स करणे याची कुठे फार गरज पडते? तरीही ते प्राथमिक शिक्षणात इतक्या प्राधान्याने का बरे शिकवावे? हा प्रश्न अनेकांना पडतो इतका, तो प्रातिनिधिक आहे. मानसशास्त्र, निसर्गाचे नियम आणि कायदे शिक्षणाचा अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमात हवा. कायद्याचे नियम हे थेट जीवनाशी निगडित आहेत. पण होतं काय? जो एल.एल.बी करेल त्यालाच तो अभ्यासक्रम मिळतो, याला काय म्हणावे?

पाठ्यपुस्तके सांभाळा हो...असे कळवळून म्हणावेसे वाटते. पाठ्यपुस्तकातील मजकुराचा परिणाम इतका खोलवर असतो की, जन्मभर स्मरणात राहतो. ते पहिल्यांदा वाचलेले शब्द सदान्कदा पाठपुरावा करतात. शिक्षणाच्या काळातच जीवनहिऱ्याला पैलू पडतात. प्राथमिक, माध्यमिक पाठ्यपुस्तकांची आणि अभ्यासक्रमाची निवड अत्याधिक संवेदनशीलतेने होणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षणाचा विशेषतः प्राथमिक शिक्षणातील बालकांची पाटी कोरी असल्याने ही पुस्तके ही बालमनावर विशेष परिणामकारक ठसा उमटवतात. पहिल्या इयत्तेत बालभारती हे पुस्तक सर्वप्रथम उघडले. बालभारतीचे ते प्राथमिक ऋण विसरून कसे चालेल? तेव्हाची उठ मुला बघ हा अरुणोदय झाला, आई मला हवी या कविता आज मोठं झाल्यावरही लख्ख आठवतात. आई कमळ बघ...येथून अक्षर ओळख जी सुरु झाली ती जोडाक्षरं, विरामचिन्हे, वाक्ये, संवाद याद्वारे पुढे मोठमोठी पुस्तके, अख्खी कादंबरी वाचून हातावेगळी करताना पायाभूत ठरली. त्यात एखादा बोजड शब्द जो कोवळ्या वयात सहजी आकलन होणार नाही, असा पाठ्यपुस्तकात चुकून आला तर तोही लक्षात राहतो कारण, ते पुस्तक जीवनातील हाती आलेला पहिला दस्तावेज असतो.

विशिष्ट कालावधीनंतर पाठ्यपुस्तकांची फेररचना होते. त्यात बहुदा जे पूर्वी चौथीला होतं ते आता दुसरीला आलंय, असं अभिमानानं सांगितलं जायचं. वाह काय पण, प्रगतीचा वाढता वेग म्हणावा आणि विद्यार्थ्यांकडून तद्नुकुल वाढीव अपेक्षांचा बोध यातून होत असे. अवजड भराभर विषय कोमल डोक्यांवर का? ओझेवाहू विद्यार्थी हा श्रमिक कामगार नाही. याचा विचार कोण करणार? पाठ्यपुस्तकांची रचना विशेष कौशल्याचे काम आहे. उदाहरणार्थ इतिहासातील घटनांचे सुसूत्रीकरण पद्धतशीर व्हायला हवे. खूप मोठा इतिहास दोन प्रकरणात कोंबला तर गोंधळ उडेल आणि तो विषय कठीण वाटून मनात धास्ती निर्माण करील. त्यामुळे, हे निव्वळ कार्यालयीन काम उरकले तर छापणारे छापतील, वितरीत करणारे वितरीत करतील आणि पोटार्थी परीक्षार्थी विद्यार्थी पेपर सोडवण्यासाठी ते वाचतील. हे दुष्टचक्र नाही काय?

आज शिक्षणाच्या शाखा वृद्धींगत होताना दिसतायत. नवी आव्हाने पेलावी लागतात पण, यात आजचे शिक्षण हे कुठेतरी घोड्याला गाढव तर बनवत नाही ना, हा विचार येतो. पोटार्थी चढाओढीत पैसा अव्यक्तपणे सारे नियंत्रण करताना दिसतोय का? हे बापाच्या भूमिकेतून पाल्याकडे बघताना प्रकर्षाने जाणवते. खाण्यासाठी धडपडणारी जनावरे आणि पैशासाठी धडपडणारी माणसे यात विलक्षण साधर्म्य दिसतेय. शिक्षण हा महागडा इश्यू झाल्याने संतती संख्या एकवरच थांबते. यामागे काही षड्यंत्र असावे का? मानवतेचे बीज रोवून नसानसात नैतिकतेची जाणीव जोपासेल, ते खरे सांस्कृतीक शिक्षण!

बालकांचे वयानुरूप मन ओळखून त्यांना रुचतील, पचतील असे विषय सौम्यसुंदर शब्दात मांडायला हवेत. कोवळ्या वयात कोणताही विषय चटकन मनाला स्पर्श करून जातो. कथा स्वरूपात विषय लवकर गळी उतरतो. आवश्यक तेथे जाणकार चित्रकाराची भावपूर्ण रंगीत चित्रे विशेष परिणाम करून जात. वयस्कांचे विषय हेवेदावे, जगाची कठोरता राजकारण यापासून बालमनाला दूर राखणे ही मोठ्यांची जबाबदारी असे. वाचन संस्कृतीची ओळख, जगाचे स्वरूप, मातापित्यांबाबत आपले कर्तव्य हे विषय वैकल्पिक अवांतर वाचनामार्फत आणि नंतर वृत्तपत्रातून त्याला जगाचे सम्यक ज्ञान आपसूकच मिळते. पण, पाठ्यपुस्तके सक्तीची असल्याने ती विशेष परिणामकारक असतात. तात्पर्य हे की, पाठ्यपुस्तक समितीची जबाबदारी फार मोठी आहे.

पूर्वापार शिक्षण आणि आरोग्य यांना मुलभूत सेवेचा दर्जा आहे. शिक्षक हे पुढची पिढी घडविणारे कारागीर असतात. पालकानंतर विद्यार्थ्यांच्या जीवनावर सर्वाधिक पगडा शिक्षकाचा असतो. पूर्वी श्रीमंत पालक पाल्याची कमकुवत शैक्षणिक कारकीर्द बघून नाईलाजाने खाजगी शिकवणीचा आधार घेताना दिसत. पण, आत तो एक व्यावसायिक राजमार्ग असून काही ठिकाणी ट्युशन पुरते उरलेले शिक्षक हा चिंतेचा विषय नाही का?

काळाची गरज लक्षात घेऊन, संगणक, कोडींग, मूल्य शिक्षण हे विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे हा स्तुत्य निर्णय आहे. तशीच पुनर्बांधणी पुढे नेत न्याय साहित्य शिक्षण वृत्तपत्र, विधी इत्यादी जीवनदर्शन देणाऱ्या विषयांचा त्रोटक अभ्यास शाळेत सुरू करता येईल. पुढील आयुष्यात फारशी गरज नसलेल्या बीजगणित, रसायनशास्त्र आदी विषयांची व्याप्ती जरा कमी करून नागरिकशास्त्र हा शंभर गुणांचा अभ्यासक्रम ठेवणे योग्य ठरेल. पुढील उच्च शिक्षणात हवं तर विज्ञान फॅकल्टी निवडून रसायनशास्त्र, जीवशास्त्र विषयांचा विस्तृत मागोवा घेता येईल.

पाठ्यपुस्तके-दशा आणि दिशा हा एक अतिशय संवेदनशील मुद्दा आहे. नंतरही, उच्च अभ्यासक्रमाचा निकष दर्जा हाच असावा. कुणाची इच्छा, शिफारस, प्रभाव याला प्राधान्य मिळू नये. उदाहरणार्थ एमएला विद्यापीठाने अमुक लेखकाचे किंवा कवीचे पुस्तक लावणे हा जर प्रतिष्ठेचा विषय होत असेल तर तिथे शिक्षणाचे राजकारण आणि पायओढ स्पर्धा यावर पायबंद घालण्याचे काम कुणाचे? शिक्षणाचे राजकारण होऊ नये. राजकारण शिक्षणातून व्हावे. राजकीय नेतृत्वाची छाप फार मोठ्या जनसमुदायावर असते. इतिहासावरही मोहर उठवणे त्यांना शक्य असते. पण, ज्यांची वर्णी लागण्यासाठी निवड प्रक्रिया काय? निवडणुकीतील भल्या-बुऱ्या मार्गाने मिळवलेले यश ही त्याच्या नेतृत्वगुणाची पावती ठरते. पण राजकीय ज्ञानाचे काय? संविधान आणि राज्यकारभाराचे शास्त्रीय शिक्षणाची अट नाही. पॉलीटीकल सायन्स, राज्यशास्त्र असे सूचक नाव असलेल्या विषयांचा उपयोग काय? निवडणुकीद्वारे जनमताचा पाठींबा कळेल पण, पुढील कार्यशैली आणि राजकीय करियर किंवा राज्यकारभार चालविण्यासाठी शैक्षणिक गुणवत्ता हवीच.

राजकीय क्षेत्रातील असामी सनदशीर शैक्षणिक मार्गाने गेलेल्यापेक्षा अधिक मोठे यश अल्पावधीत कमावताना दिसतात. येथे थेट निवडणुकीतील विजयावर अंतिम शिक्कामोर्तब होऊन ते सत्ताधारी होत हुकुम सोडतात. भोळे सामान्य मतदार आश्चर्यानं तोंडात बोट घालतात. शिपाई पदासाठीही देशव्यापी जाहिरात, रीतसर विहित नमुन्यातील अर्ज, लेखी आणि मौखिक चाचणी, प्रत्यक्ष मुलाखत इतके ठोकून निवड होते. हा न्याय्य मार्ग राजकारण प्रवेशासाठी डावलला जावू नये. राजकारणात एखादा कामाचा माणूस बरा वाटला किंवा अंगभूत निष्ठा इतकेच त्याचे ऑफ रेकॉर्ड क्वालिफिकेशन का?

राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी उमेदवार कलाशाखेतील राज्यशास्त्र हा विषय उत्तीर्ण प्राविण्य प्राप्त असावा. अशी पूर्वअट आल्यास कलाशाखेला ऊर्जितावस्था येईल ती वेगळीच! उमेदवार विपुल प्रमाणात असल्यास त्याची एन्ट्रन्स टेस्ट घ्यावी आणि मगच संवैधानिक मार्गाने ते निवडणुकीसाठी पात्र ठरतील. आज शिक्षणाचा सर्वत्र लक्षणीय प्रसार झाल्याने बहुसंख्य शिक्षित आहेत. दीडशे कोटींच्या देशात अनेक लायक, शिक्षित लोक सत्तेपासून दूरस्थ अशा आपापल्या जागी खितपत पडलेले आणि याउलट जे अर्धशिक्षित असूनही सक्रीय नेतृत्वाच्या आसपास वावरणाऱ्यांची पुन्हा पुन्हा वर्णी लागणे, याला राजकीय क्षेत्रात नशीब अजमावणे हा शब्दप्रयोग रूढ झाला असावा. म्हणजे राजकारण्यांची मजा आहे बुवा ! ही जनतेची कोपरखळी ध्यानात येईल काय?

एकेकाळी मेकॉले या विदेशीने इंग्रजी शिक्षण प्रणाली लागू केली होती. ती योग्य की अयोग्य? हा मुद्दा तूर्त बाजूला ठेवू या. पण, त्याने त्या काळात केलेली लक्षणीय अंमलबजावणीची पद्धत आज नक्कीच अनुकरणीय आहे. आता नव्याने कुणी नागरिकशास्त्र शिकवणारा स्वदेशी मेकॉले हा जगन्नाथाचा रथ पुढे नेईल काय ?

# भारतीय जैन संघटनेच्या नूतन जिल्हा कार्यकारिणीचा उद्या शपथविधी सोहळा

## राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला यांची प्रमुख उपस्थिती -विजयकुमार जैन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय जैन संघटनेची विभागीय कार्यकारणी, जालना जिल्हा कार्यकारिणी व महिला कार्यकारिणीच्या नवनियुक्त अध्यक्षांचा शपथविधी सोहळा रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता गुरु गणेश भवन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यानंतर जैन संघटनेच्या प्रदेश कार्यकारणीची सभा होणार आहे. समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांनी केले आहे.


अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला हे राहणार आहेत. उद्घाटक म्हणून भारतीय जैन संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विनयकुमार कोठारी, स्व-गताध्यक्ष म्हणून विभागीय उपाध्यक्ष विजयराज सुराणा, प्रमुख अतिथी म्हणून प्रदेश उपाध्यक्ष केतन शाह, प्रदेश सचिव प्रविण पारख, राष्ट्रीय महामंत्री दिपक चोपडा, उद्योगपती गौतमचंद श्रीश्रीमाळ, जालना पीपल्स बँकेचे चेअरमन संजयकुमार मुथा यांची उपस्थित राहणार आहे.

याप्रसंगी भारतीय जैन संघटनेच्या विभागीय कार्यकारणीचे अध्यक्ष धनराज सोळंकी, जालना जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन, सचिव दीपक मोदी, उपाध्यक्ष रवींद्र संचेती, गौतम श्रीश्रीमाळ, ड. अनिल संचेती, पवन सुराणा, सहसचिव स्वप्निल लव्हाडे, कोषाध्यक्ष श्रीपाल मरलेचा, जनसंपर्क अधिकारी ओम धोका, कार्यकारणी सदस्य विजय बाफना, चैतन्य वायकोस, शुभम पिपाडा, जय कोटेचा, अतुल बिनायकीया, पंडित खुळे, रविराज धोका, कुशल गेल्डा, प्रणय पहाडे, चेतन बोथरा, सिद्धार्थ संचेती, अजय बोरा, कुशल देसरडा, आशिष शाह, योगेश कासलीवाल, हर्षवर्धन सेठिया, नीरज सेठीया, पंकज जैन,तसेच महिला कार्यकारणीच्या अध्यक्ष सौ. सरिता प्रविणकुमार कुचेरिया यांना राष्ट्रीय अध्यक्ष शपथ देणार आहेत. यावेळी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जैन संघटना, जिल्हा जालनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खासदार डॉ.कल्याण काळे आक्रमक

## केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांचा कापूस अजूनही घरात पडून आहे, कारण भारतीय कापूस महामंडळ (उउख) कडून खरेदी केंद्रे अनियमितरित्या चालवली जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांकडून कमी दरात कापूस विकावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांची भेट घेऊन तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.

खासदार काळे यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांकडून अजूनही ५०% पेक्षा अधिक कापूस विकला गेलेला नाही, आणि अशा परिस्थितीत उउख ची खरेदी केंद्रे बंद करणे हे अन्यायकारक आहे. केंद्र सरकारने कापूस खरेदी प्रक्रिया अखेरच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचेपर्यंत सुरू ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. सध्या खाजगी व्यापारी उउख पेक्षा कमी दर देऊन शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करत आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सरकारी हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या संदर्भात केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी या मुद्द्यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी उउख ची खरेदी केंद्रे सुरू ठेवण्याचा आणि व्यापाऱ्यांच्या मनमानीला आळा घालण्याचा विचार केंद्र सरकार करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि त्यांच्या कापसाला न्याय मिळावा, यासाठी खासदार काळे यांचे प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## संक्षिप्त

### शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसीसाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्याचा लाभ कायम रहावा यासाठी ई-केवायसी आणि मोबाईल सिडींग करुन घेणे आवश्यक आहे. तरी तहसील कार्यालयाकडून तालुक्यातील गावामध्ये ई-केवायसीसाठी जनजागृतीपर शिबीरे घेण्यात येणार आहेत. तरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांनी शिबीरात येवून ई-केवायसी अवश्य करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

स्वस्त धान्य वितरण प्रणाली पारदर्शक व्हावी यासाठी शासनाने सुरु केलेल्या ई-केवायसीबाबत काही शिधापत्रिकाधारक उदासीन दिसत आहेत. ५ लाख ६५ हजार ७०० लाभार्थ्यांनी अद्यापही ई-केवासी केलेली नसल्याचे दिसुन आले आहे. तरी दि.२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ई-केवायसी न केल्यास या लाभार्थ्यांना स्वस्त धान्यापासून कायमचे वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. लाभ मिळण्यासाठी अंत्योदय आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिका धारकांच्या हाती आणखी काही दिवसाची अवधी आहे. आपल्या तालुक्यातील गावात ई-केवायसी सिडींग करुन घेण्यासाठी सर्व गावामध्ये शिबीर घेण्यात यावेत. अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. शिधापत्रिकाधारक व कुटूंबातील सदस्य स्वस्त धान्यापासुन वंचित राहू नये यासाठी ई-केवायसी करणे अत्यंत गरजेचे आहे. जालना-१३६९४२, बदनापुर-४९६४६, भोकरदन-७६२६१, जाफ्राबाद-३५५५१, मंठा-५५५६६, परतूर-५६९६४, अंबड-८७१६८, आणि घनसावंगी - ६७७०० याप्रमाणे तालुकानिहाय शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. असेही कळविले आहे.

### अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अर्ज करावेत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

अंबड एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस ५१ पदे मानधनावर भरण्यात येणार आहेत. अर्जाचा विहीत नमुना ग्राम पंचायत व अंगणवाडी केंद्रात उपलब्ध करुन दिलेला आहे. तरी किमान बारावी उत्तीर्ण वय १८ ते ३५ दरम्यान असलेल्या स्थानिक महिला अर्जदारांनी शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आपले अर्ज अंबड येथील पंचायत समितीच्या परिसरातील एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पात सादर करावेत, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंबड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### संत गुरू रविदास महाराज जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नारायण गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**



जाफाबाद येथील दवलत पुरा हनुमान मंदिरा मध्ये संत गुरू रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त एका बैठक ठेवण्यात आली होती.

या बठकीत संत गुरू रविदास महाराज जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली तर यावेळी अध्यक्षपदी नारायण गायकवाड, उपाध्यक्ष बारकु हेमाजी गोठवाल,सचिव श्रावण पट्ठे, कोषाध्यक्ष हिरालाल रेषवाल यांची सर्व एकमताने निवड करण्यात आली

यावेळी माजी सभापती रमेश धवलिया, भावलाल वायाळ,प्रा.अमरसिंग धवलीया,प्रा पहारे,भगवान धवलिया, झनक चव्हाण, शिगणे,योगेश बुवा, सुनील फुलवाडे, रतन चव्हाण,राजू गोठवाल,हिरालाल बंसवाल,संतोष पट्ठे,रामभाऊ शिराळे, भास्कर ब्राह्मने, बाबुराव लहाने,राजू रमने,विजय जोहरे,आदींची उपस्थिती होती. कार्यकारणची सर्वांनी स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सर्वांनी एकत्रित येऊन संतगुरू रविदास उत्सव २०२५विविध उपक्रमांनी व भव्यदिव्य पद्धतीने साजरे करण्याचा सर्वांनी संकल्प केला.

# वरिष्ठ कनिष्ठ अधिकारी व खातेप्रमुख यांची घेतली आ.उढाण यांनी बैठक



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड घनसांवगी विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर व सर्व सामान्यांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय योजनांवर तसेच त्या राबवत असतांना प्रशासनाला येणाऱ्या अडचणींवर आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली.

या बैठकीस घनसांवगीच्या तहसीलदार योगीता खटावकर, अंबड चे तहसीलदार विजय चव्हाण, जालनाच्या तह-सीलदार छाया पवार, घनसावंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर जाधव, अंबडचे उदयसिंग राजपुत, जालनाचे संदीप पवार मुख्य कार्यकारी अभियंता शालगर मॅडम यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# भोकरदन शहरासह तालुक्यात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी व दिन दलितांची माय माऊली रमाई आंबेडकर यांची जयंती भोकरदन शहरासह तालुक्यात मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील नवे भोकरदन भागातील रमाई नगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर माता रमाई यांच्या तैलचित्राचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक त्रिशरण पंचशील घेण्यात आले. त्यानंतर सम्राट भोगवर्धन बुद्ध विहार येथे दिवंगत भदंत अंगुलीमाल शाक्यपुत्र महास्थवीर यांनी श्रीलंका येथून आणलेल्या व संघ भूमी नालंदा बुद्ध विहार नागेवाडी येथे वाढीस लागलेल्या बोधीवृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वैशाली दाभाडे, धुपताबाई पगारे, चंद्रभागाबाई पगारे, सुरेखाबाई पगारे, संगीताबाई बिरारे,अलकाबाई बनकर, शिलाबाई पगारे, अल्काबाई गायकवाड, नगरसेवक दिपक बोर्डे, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सर्वेसर्वा सचिन पारखे,प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते प्रदीप जोगदंडे, सुरेश बनकर, कमलकिशोर जोगदंडे,रमेश बिरारे, अनिल पगारे, जगन्नाथ काळे, विशाल मिसाळ, मंगेश पगारे, अभिजित भिसे, पप्पू गायकवाड यांच्यासह सम्राट अशोक नवयुवक मित्रमंडळ, सुजाता महिला मंडळ, फुले नगर मित्रमंडळ, समता नगर मित्रमंडळ आदींची उपस्थिती होती.



### सुभानपुर येथे माता रमाई जयंती साजरी

दरम्यान, तालुक्यातील मौजे सुभानपुर येथेही मोठया उत्साहात माता रमाई जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भोकरदन येथील नगरसेवक दिपक बोर्डे,सचिन पारखे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप जोगदंडे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विशाल मिसाळ, युवा नेते मंगेश पगारे,लतीफपूरच्या उपसरपंच वैशाली दाभाडे आदी उपस्थित होते.दरम्यान यावेळी प्रथम सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली व त्यानंतर माता रमाई यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवाजी पाटील गाढे,रमेश खरात, समाधान खरात,राजू खरात, दादाराव खरात,शालिक खरात,जयंती समितीच्या अध्यक्षा शारदाबाई खरात,सचिव अरुणाबाई खरात,उपाध्यक्ष लक्ष्मीबाई खरात,वच्छलाबाई खरात,सोनू खरात,दगडाबाई दाभाडे,अनिता खरात,ताराबाई खरात,प्रयागबाई खरात,छाया खरात, संगीता खरात,भाग्यश्री खरात,मंगलाबाई खरात,मुक्ताबाई खरात,सरला खरात,पद्माबाई खरात,रमाबाई खरात,वच्छलाबाई खरात आदींची उपस्थिती होती. दरम्यान, तालुक्यातील गाव खेड्यात माता रमाई जयंतीचा उत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला.

# पोलिस अधीक्षकांनी केला परतूर पोलिसांचा प्रशस्ती पत्र देऊन गौरव

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



मागील काळात परतूर पोलिसांची कामगिरी पाहता कत्तली साठी सिल्लोड येथून परभणी येथे घेऊन जाणारे ४७ गोवंश जनावरे पकडून त्यांचे प्राण वाचवले, एकूण ३७ लाख रुपये किंमती चा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरुद्ध कारवाई केली होती,

तसेच सोलार टाटा प्लांट परतूर येथील केबल ची चोरी करणारी टोळी ला पकडून त्यांना अटक करून ६ गुन्हे उघकीस आणून आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करून कारवाई केली होती, तसेच परतूर शरात विनापरवाना अवैध रित्या घरगुती वापराचा गॅस स्वतः चे फायद्या साठी ऑटो रिक्षा मध्ये भरून विकताना मिळून आल्याने त्यांना रंगे हाथ पकडून गुन्हा दाखल करून कारवाई केली होती, परतूर पोलिसानी अशी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे आज दिनांक ७ फेब्रुवारी रोजी गुन्हे आढावा बैठकी मध्ये अजय कुमार बंसल, पोलिस अधीक्षक, आयुष नोपणी, अप्पर पोलिस अधीक्षक, जालना यांनी एम.टी.सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर, पोहेकॉ / अशोक गाढवे, पोकॉ/ दीपक आडे, पोकॉ/ ज्ञानेशोर वाघ, पोकॉ/ आचूत चव्हाण, चालक/ पोकॉ स्वप्नील फंड पॉका/ आर. एस. पारवे सर्व नेमणूक पोलिस स्टेशन परतूर यांना प्रशस्ती पत्र देऊन गौरवण्यात आले आहे. त्यामुळे परतूर पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शहरातील संघटित व असंघटित कामगारांचा जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते आज (दि. ६) गुरुवार रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्यालयात कामगार आघाडीचे मुकेश सावंत यांनी जालना शहरातील त्यांच्या समर्थक संघटित व असंघटित कामगारांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी असंघटीत कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, शहर कार्याध्यक्ष मिर्जा अन्वर बेग, निलेश रत्नपारखे यांची उप-स्थिती होती. याप्रसंगी कामगार आघाडीचे मुकेश सावंत,बी एल इंदुरे, राजूभाऊ बोंद्रे, उमेश बरसे, डोईफोडे राजेश्वर, व्हि.डी.हमाने , गोपाल नरहरे, सोमनाथ बल्लोरे, रामराव वड्डे, प्रल्हाद जगताप, रवी जिगे,गंगाराम हदवे,वीरभद्र वसगते, अमोल कंडारे, उमेश सावंत, दीपक खरात, मनोज मस्के, अमोल रत्नपारखी अरविंद रत्नपारखी मनोज रत्नपारखे, पवन वाहुळ, संघर्ष खरात ,निखिल रत्नपारखे, आकाश जाधव ,गोरख जाधव ,प्रदीप नवले ,उमेश सावंत, राजेश चव्हाण, ज्ञानेश्वर काळे यांच्यासह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी प्रवेश करताच मुकेश सावंत यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या असंघटित कामगार विभागाच्या जालना शहर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करून जबाबदारी देण्यात आली. मुकेश सावंत यांच्या निवडीबद्दल सर्वांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या . याप्रसंगी शहरातील अनेक संघटित व असंघटित कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मंठा शहरातील परीक्षा केंद्र नावालाच कॉपीमुक्त

## मंठ्यात ॲडमिशन घेऊ, आणि पास होऊ?

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

शिक्षण विभागाकडून कॉपीमुक्त परीक्षा घेण्यावर भर देण्यात येतो. परंतु , मंठा शहरांमध्ये परीक्षा केंद्रावर दरवर्षी परीक्षा केंद्रामध्ये व बाहेर कॉफ्यांचा बाजार पाहायला मिळतो. विशेष , म्हणजे शहरातील पत्रकार बांधव दरवर्षी याबाबत आवाज उठवतात पण प्रशासनाकडून कुठलीच ठोस भूमिका घेण्यात येत नाही.मंठा शहरातील परीक्षा केंद्रावर कॉफी मुक्ती फक्त कागदावर दाखवली जाते. याकडे जिल्हाधिकारी साहेब यांनी गांभीर्याने लक्ष देऊन हुशार विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी परीक्षा केंद्रावर कॉफी मुक्त करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे , अशी मागणी सुज्ञ नागरिकासह हुशार विद्यार्थ्यांतून होत आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावी बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी ते मार्च या महिन्यात होणार आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून व शिक्षण विभागाकडून तयारी देखील करण्यात आली आहे. परीक्षा म्हटलं की मंठा शहरातील परीक्षा केंद्रावर पास होण्याची हमी देण्यात येते. खरंतर मंठा शहरांमधील शाळेमध्ये नाशिक पुणे मुंबई परभणी लातूर यासह विदर्भातून देखील ॲडमिशन होतात याप्रकरणी थोडं खोलवर प्रतिनिधी गेले असता. त्यांना असे कळाले की , मंठा शहरातील परीक्षा केंद्रावर पास होण्याची हमी मुख्याध्यापक व शिक्षकाकडून दिली जात असल्याची चर्चा होत आहे. परीक्षा सुरू झाल्यानंतर शिक्षक मुख्याध्यापकाचे नातेवाईक त्याचबरोबर मित्रपरिवार असलेले परीक्षार्थी विद्यार्थ्यांना शाळेअंतर्गत कॉफी पुरविल्या जातात .तर सर्वसामान्य परीक्षार्थी यांना बाहेरून कॉफी पुरविल्या जातात. मंठा शहरातील परीक्षा केंद्रावर परीक्षा काळामध्ये जत्रा व बाजाराचे स्वरूप येते. खरं तर मंठा शहरातील परीक्षा केंद्रावर शिक्षण विभागाच्या कॉफीमुक्त अभियानाला हरताळ फासला जात असल्याचे अनेक वर्षापासूनचे चित्र आपल्यासमोर आहेत. आता यावर्षी नेमकं काय स्थिती राहते ही बाब परीक्षा सुरू झाल्यानंतर समोर येईल.

**दरवर्षी पुढे पाठ, मागे सपाट अशी मंठा शहरातील परीक्षा केंद्रांची स्थिती ; बैठे पथक व कस्टडीयन असताना देखील परीक्षा केंद्रावर कॉफी कशी पुरविली जाते , नागरिकांना शंका?**

या कॉफी बहाद्दरामुळे हुशार विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. यात नेमकी चूक कोणाची हे मात्र नागरिकांना अद्याप समजू शकले नाही.

जिल्हाधिकारी व शिक्षण अधिकारी यांनी मंठा शहरातील परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा सूचना दिल्या आहेत. परंतु सदर कॅमेरे हे शाळेच्या परिसरात राहतात शाळेच्या आत कुठलेही कॅमेरे दिसत नाहीत.कॅमेरे असूनही परीक्षा केंद्रावर काही शिक्षकाकडून कॉफ्या पुरल्या जातात. मंठ्यात तर विशेष पेपर फुटी सारखे प्रकार देखील अनेकदा घडलेले आहेत. याबाबत चौकशा देखील झाल्या परंतु नंतर सर्व परिस्थिती मिटवली जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे शिक्षण मंत्री , शिक्षण विभागाचे संचालक जिल्हाधिकारी यांनी मंठा शहरातील परीक्षा केंद्राबाबत गांभीर्याने घेऊन कॉफी मुक्त अभियान कसे राबविण्यात येईल याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकातून होत आहे.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंड्यात मोफत दिव्यांग तपासणी शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे व तालुक्यातील दिव्यांग प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्यअध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली परंडा येथे दि.७ फेब्रुवारी रोजी दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले.

यासाठी जिल्हा शैल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परंडा यांच्या वतीने हा कॅम्प यशस्वी पार पाडण्यात आला.

या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग, मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण ४५ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉक्टर डॉ. ज्योती कल्याणी डॉ. आयुश शिंदे, डॉ. खंडागळे यांनी कामकाज पाहिले

कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योगसमूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, शहराध्यक्ष गोरख देशमाने, सरपंच संतोष भुजे,

कानिफनाथ सरपने, हाजगुडे, जाधव, बापू खताळ, डॉ. शेटे आदी परांडा येथील कर्मचारी यांनी सहकार्य केले.



### संक्षिप्त वृत्त...



### तेरमध्ये माता रमाई जयंती साजरी

**तेर, दि.८ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पुर्व भीमनगर येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आले. यावेळी मात रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सामुदायिक वंदना घेण्यात आली. यावेळी अभिजीत सावंत, किशोर धावारे, अर्शद मुलाणी, भाऊराव धावारे, शकील शेख, भास्कर धावारे, प्रभाकर सोनवणे, आक्रम बागवान, माणिक गाल्टे, करण धावारे, सुरज नलावडे, रितेश धावारे आदी उपस्थित होते.

### अर्चनाची कबड्डी संघात निवड

**तुळजापूर, दि.८ फेब्रुवारी -**

तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय मधील संगणक विभागातील अंतिम वर्षात शिकणारी विद्यार्थिनी



अर्चना कांबळे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेच्या कबड्डी टीममध्ये निवड झाली आहे. याबद्दल संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. वाघमारे डीजे, प्राचार्य प्रा. आडेकर आर. एच., प्रा. डोईजोडे एस.एम. व महाविद्यालयाचे विश्वस्त यांनी अभिनंदन केले.

### पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

शहरात संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७३९ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त विविध धार्मिक



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोनार समाजातील थोर संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी शनिवार (दि.१५) सराफ व सुवर्णकार संघटनेच्या वतीने साजरी करण्यात येत आहे. सराफ व्यापारी मनोज चिंतामणी यांच्या मातोश्री निवासस्थानी संत नरहरी महाराज पुण्यतिथी उत्सवानिमित्त शनिवारी सकाळी १० ते १२ या कालावधीत श्रीसंत बाळुमामा जिवन चरित्र कथाकार तथा बाळुमामा मालिका फेम (रामाण्णा) प्रसिध्द किर्तनकार मेजर विक्रम जगताप यांचे गुलालाचे किर्तन होणार आहे. दुपारी १२ वाजता पुष्पवृटी करण्यात येणार त्यानंतर महाआरती करुन महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.



### ‘लिट्ल’मध्ये रमाई आंबेडकर जयंती साजरी

**तुळजापूर, दि.८ फेब्रुवारी -**

लिट्ल फ्लॉवर्स शाळेमध्ये रमाई भिमराव आंबेडकर यांची आज जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने लिट्ल फ्लॉवर्स मराठी प्राथ. शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार आणि मुख्याध्यापक अविनाश गव्हाणे यांच्या हस्ते रमाईंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षिका अनिता कदम यांनी रमाईंचा जीवनपट सांगितला. रमाबाई ते रमाई हा प्रवास खूप खडतर होता; परंतु तो त्यांनी यशस्वीपणे पार पाडला. अशा त्यागमूर्ती, स्त्रीभूषण रमाई आंबेडकर यांची जयंती आनंदाने साजरी करण्यात आली.

### सुरेशसिंग परिहार महाराज यांचे निधन

**जळकोट, दि.८ फेब्रुवारी -**



वागदरी (ता.तुळजापूर) येथील ग्रामदैवत संत श्रेष्ठ सद्गुरु भवानसिंग महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी तथा भवानसिंग महाराज भजनी मंडळाचे अध्यक्ष हभप. सुरेशसिंग उमरावसिंग परिहार महाराज यांचे दि.६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

---

▶▶ गोरगरिबाकडून दमदाटी करून वसुली तर धनदागड्यांना नरमाई... एक लाख पेक्षा जास्त विजबील थकीत असलेल्या ग्राहकांची संख्या ९१...

# विद्युत महामंडळाकडून थकबाकी वसुलीमध्ये दुजाभाव; सामान्य ग्राहकांना दमदाटी

▶▶ तुळजापूर शहरात दोन लाख पेक्षा जास्त विजबील... ▶▶ विद्युत महामंडळाचे जवळपास पावणे चार कोटीची वीजबिले थकीत...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ फेब्रुवारी -**

शहरामध्ये विजबील वसुलीसाठी अधिकारी व कर्मचारी यांच्याकडुन गोरगरीब जनतेला दमदाटी करून वसुलीसाठी त्रास आणि धनदांडग्यांच्या बिलाबाबत विचार ना देखील केली जात नाही. वसुली करताना होत असलेल्या दुजाभावा करणाऱ्या संबंधीत कर्मचारी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करुन त्यांना निलंबीत करण्याची मागणीचे निवेदन निलेश कदम (परमेश्वर) यांनी महावितरण मंडळाचे कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.



निलेश कदम यांनी माहितीचा अधिकार टाकून महावितरण कार्यालयाकडून थकबाकीदारांची माहिती घेतली. तेव्हा तुळजापूर शहरामध्ये अंदाजे ३,७५,००,००० रूपये (पावणे चार कोटी) विजबील थकीत असल्याचे समजले. त्यामध्ये तुळजापूर शहरामध्ये दोन लाख पेक्षा जास्त विजबील थकीत असलेले ग्राहक १० व एक लाख रुपये पेक्षा जास्त विजबील थकीत असलेल्या ग्राहकांची संख्या ९१ आहे. महावितरण कार्यालयामार्फत विजबील वसुलीसाठी असलेले कर्मचारी व अधिकारी हे ज्याच्याकडे जास्तीचे विजबील थकीत आहे.

अशा व्यक्तीचे वीज बील वसुली न करता ते केवळ गोरगरीब व कष्टकरी व्यक्तीचे ज्यांच्याकडे केवळ पाच ते पंचेवीस हजार रुपये थकबाकी असलेल्या ग्राहकांकडुन सक्तीने दमदाटी करुन त्यांचे वीज कनेक्श्यान तोडत आहेत. परंतु ज्यांच्याकडे पन्नास हजार ते लाखो रुपयांचे थकीत बील आहे, अशा



व्यक्तीकडुन वसुली करण्यास किंवा वीज तोडण्यास धजावत नाहीत. त्यामुळे कर्मचारी व अधिकारी यांच्याकडुन थकीत विजबील वसुली व वीज तोडणीमध्ये दुजाभाव केला जात आहे. वीज बील वसुलीमध्ये दुजाभाव करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्यती कायदेशीर कारवाई करुन त्यांना निलंबीत करावे, असे निवेदनात म्हटले आहे.

अशा कर्मचारी, अधिकाऱ्यांवर महावितरण विद्युत महामंडळाने तात्काळ कारवाई करावी, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनात देण्यात आला आहे.

## परंड्यात महसूल कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

परंडा येथील महसूल कर्मचारी यांना कार्यालयात येऊन शिवीगाळ केल्याच्या निषधार्थवतीने कर्मचारी यांनी आज कामबंद आंदोलन पुकारले व सर्व कामकाज बंद करून निवेदन देण्यात आले.

तहसीलदार परंडा यांना दिलेल्या निवेदन पुढे म्हटले आहे की, जरिचंद गोडगे (रा.रोसा हल्ली मुक्काम बार्शी) आज दि.७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.४५ वाजता तहसिल कार्यालय परंडा येथील महसूल विभागात येऊन जगन्नाथ खुने यांना खासगाव येथील भाऊसाहेब यांचे सन २०२२ चे तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली अशी विचारणा केली. सदरचा तक्रार अर्ज हा भाऊसाहेब यांचा असून, जरीचंद गोडगे यांचा सदर अर्जाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसताना केवळ हस्तक (एजंट) म्हणून गोडगे तहसिल कार्यालय परंडा येथे वारंवार वावरत असल्याचे दिसून येत आहे.

प्रकरणातील सुनावणीसाठी तहसिलदार यांचे दालनाकडे जात असताना, जगन्नाथ खुने याचे म्हणने ऐकून न घेता खुने, महसूल सहाय्यक यांना दम दाटी व अश्लिल भाषेत शिवीगाळ करून अंगावर धावत येऊन दहशत निर्माण करुन धक्काबुक्की करून मारहाण केली व तुला बघुन घेतो अशी धमकी दिली. तसेच कार्यालयात गोंधळ घातला व शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला आहे. त्यानंतर गोडगे यांनी तहसिलदार यांचे दालनात, त्यांचे समक्ष खुने यांना शिवीगाळ केली.

सदर घटनेचा आम्ही तीव्र निषेध करत आहोत. त्या निषेधार्त, परंडा तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी जरीचंद गोडगे यांचेवर फौजदारी कारवाई होईपर्यंत आज दि.७ फेबुवारी पासून बेमुदत कामबंद आंदोलन करीत असल्याचे नमूद केले आहे.

निवेदनावर जगन्नाथ खूने, मंदार कदम, मोहिलवाड एन.के., लवटे, पठान एम.एम., मंडळ अधिकारी तोरकडे एन.बी, साळूंके डी.के. यांच्या सह महसूल कर्मचाऱ्यांच्या सहया आहे.

## येरमाळ्यात पालक मेळाव्यास पालकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.८ फेब्रुवारी -**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत येरमाळा बीट अंतर्गत दि.६ रोजी येथील आनंदधाम सभागृहामध्ये पालक, आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी येरमाळ्यासह पंचक्रोशीतील पालकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी बोराडे, संगीता सावंत, अनिता थोरात, सरपंच प्रिया बारकुल, अनुपमा बोरफलकर, डॉ. संदीप तांबारे, डॉ. पल्लवी तांबारे यांच्यासह आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामस्थ, महिला पालक, उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरख बारकुल यांनी केले तर उपस्थितांचे आभार पवार यांनी मानले. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोहारा न.पं.च्या उपनगराध्यक्षपदी अमीन सुबेंकर यांची बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ फेब्रुवारी -**

लोहारा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षपदी शिवसेना पुरस्कृत नगरसेवक अमीन सुबेंकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. लोहारा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी दि.६ फेब्रुवारी रोजी विशेष सभा नगरपंचायतच्या सभागृहात बोलाविण्यात आली होती.

पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उमरगा गणेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत उमेदवार अमीन सुबेंकर यांचा एकमेव उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची लोहारा नगर पंचायतच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी गणेश पवार यांनी घोषित केले.

यावेळी नगराध्यक्षा वैशाली खराडे, गटनेत्या सारिका बंगले, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, पोनि. अजित चिंतळे, पोउनि. जोकार, राजेंद्र माळी, अभिमान खराडे, शब्बीर गवंडी, श्रीकांत भरारे, गौस मोमिन, कमल भरारे, आयुब हबीब शेख, जालिंदर कोकणे, आरती कोरे, मयुरी बिराजदार, शमाबी शेख, शामल माळी, सुमन रोडगे, आरती गिरी, विजयकुमार ढगे, संगिता पाटील, इकबाल मुल्ला यांच्यासह सर्व नगरसेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत मीरा स्कूलमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

परांडा येथील संत मीरा पब्लिक स्कूल येथे लहान गटातील विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये इ. नर्सरी, ज्यु.केजी व सी. केजीच्या १३० हुन अधिक चिमुकल्यांनी सहभाग घेतला होता

या स्पर्धेत बालकांनी डॉक्टर, वकील, शिक्षक, पुढारी, भाजीवाली, दूधवाला, छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माँसाहेब, झाशीची राणी, भगतसिंह, लोकमान्य टिळक, शेतकरी, महाराणा प्रताप,भारत माता इ. अनेक प्रकारच्या वेशभूषा केल्या होते. पात्राला साजेसे असे सवांद, डायलॉग विद्यार्थ्यांनी अतिशय चांगल्या व प्रभावीपणे बोलून दाखवले. तसेच यावेळी छोट्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची फिल्मी गिते, लोकगीते यावर अप्रतिम नृत्य करत उपस्थित लोकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या निमित्ताने वर्षभारत शाळेने राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरीय स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संतोष भांडवलकर व प्रमुख पाहुणे शैला सुजितसिंह ठाकूर, अनुजा दैन, ॲड. फातिमा मुजावर, निशिगंधा सोनवणे, सुवर्णा सिरसट, मनीषा कोकाटे, नूरजन्हां शेख, ॲड. नुरुद्दीन चौधरी, सरपंच दीपक दुबळे, सुरेश घाडगे, आप्पासाहेब शिंदे, संतोष शिंदे, धनंजय पाटील, प्रताप पाटील, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षक म्हणून पूनम शिंदे व शुभांगी गोडगे यांनी काम पहिले. सूत्रसंचालन अनुराधा गव्हाळे व माधुरी नांगरे यांनी केले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाचे संतोष शेरे, प्रिती देशपांडे, रोहिणी कुंभार व बालाजी गोरे सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जयंतीत हुलडबाजी करणाऱ्यांवर कारवाई करा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

१९ फेब्रुवारी रोजी अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती आहे. या दिवशी महाराजांची विविध उपक्रमाने जयंती साजरी केली जाते. ढोकी पोलीस स्टेशन हद्दीतील गावामध्ये पण जयंती शांततेने आणि पारंपरिक वाद्य वाचवत मिरवणुका काढून जयंती उत्सवात साजरी करण्यात यावी तसेच जयंतीमध्ये दारू पिऊन धिंगाणा घालण्यांवर कडक करावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने ढोकी पोलिस ठाण्याचे एपीआय. हजारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आधुनिक डीजेच्या तालावर मिरवणुका निघाल्या तरी त्या शांततेत निघाव्यात आणि जनतेचा उत्सव संपन्न व्हावा. यासाठी आपण जयंती प्रयत्न करावेत आणि जरी मिरवणुकामध्ये जर कोणी सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन किंवा धिंगाणा, भांडण करण्याचा जाणून-बुजून प्रयत्न करत असेल तर अशा व्यक्तीवर व्यक्तीसमूहावर गुन्हे दाखल करावेत आणि त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ढोकी पोलिस स्टेशन हद्दीमध्ये शांततेच्या मार्गाने आणि उत्साहात सोहळा संपन्न व्हा यासाठी पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच यांच्यासोबत शांत समितीची बैठक घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे, असे निवेदनात नमूद केले आहे.

निवेदन देतेवेळी तालुकाप्रमुख लहु शिंदे, गणेश पवार, जाधव, पंकज देशपांडे तसेच शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी व छावा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# खरीप २०२२ च्या पंचनामाच्या प्रति द्या अन्यथा कारवाई अटळ; जिल्हाधिकाऱ्यांचा यांचा विमा कंपनीस कारवाईचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या तक्रारी अर्जावरून ६ फेब्रुवारी रोजी दुपारी बारा वाजता जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली या बैठकीत खरीप २०20 व २०२१ च्या खरीप हंगामातील न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती, खरीप हंगाम २०२२ मधील पंचनामाच्या प्रति प्रलंबित विमा भरपाई, खरीप हंगाम २०२३ व २०२४ मध्ये अपात्र केलेल्या पूर्व सूचनाबाबत जिल्हास्तरीय समितीने दहा जुलै २४ रोजी दिलेल्या आदेशाचा कारवाई अहवाल, खरीप व रब्बी २०२३ व २४ मधील प्रलंबित विमा भरपाई, रब्बी हंगाम २४-२५ मध्ये कांदा पिकाच्या क्षेत्र पडताळणी करणे बाबत, मृगबहार व अंबिया बहार २०२४-२५ मध्ये विमा क्षेत्र पडताळणी बाबत चर्चा करण्यात आली व काही आदेश देखील पारित करण्यात आले.

खरीप २०२० मधील उर्वरित २२५ कोटी रकमेसाठी २४ फेब्रुवारी रोजी अंतिम सुनावणी असून खरीप २१ मधील शासन व अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या ३७४ कोटी रकमेसाठी दहा मार्च रोजी सुनावणी आहे.

यात शासनाने खाजगी वकील नेमला असून शासकीय वकील व खाजगी वकील यांच्याकडून बाजू मांडली जात आहे.

खरीप हंगाम २०२२ मधील पंचनामेच्या प्रती देण्याचा मुद्दा अनिल जगताप यांनी जोरदारपणे मांडला त्यावर जिल्हाधिकारी यांनी तातडीने पंचनामाच्या प्रतिद्या अन्यथा कारवाई करण्यात येईल सज्जन इशारा कंपनीला दिला तसेच शेतकऱ्याचे उर्वरित ५७ लाख रुपये देखील देण्याचे आदेश देण्यात आले. प्रति मिळाल्या तर आणखी पाचशे कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळू शकतात. प्रति नाही दिल्यास उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी हे येणाऱ्या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न उपस्थित करून कंपनीवर कारवाई करतील, अशी माहिती देखील अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी यांच्या समक्ष पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिली. खरीप रब्बी हंगाम २०२३-२४ मधील जिल्हास्तरीय समितीने आदेशित केलेल्या आदेशाप्रमाणे जवळपास सात हजार शेतकऱ्यांच्या पूर्वसूचना क्षेत्रीय स्तरावर पाठवून त्याची पडताळणी करून शेतकऱ्यांना रक्कम वितरित करावा असा आदेश देखील देण्यात आला.

> **अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या याचिकेवर २४ फेब्रुवारी व १० मार्चला सुनावणी...**
>
> ▶▶ खरीप २०२० मधील उर्वरित २२५ कोटी रकमेसाठी २४ फेब्रुवारी रोजी अंतिम सुनावणी असून खरीप २०२१ मधील शासन व अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या ३७४ कोटी रकमेसाठी दहा मार्च रोजी सुनावणी आहे.

चालू वर्षाच्या खरीप व रब्बी हंगामातील नुकसान भरपाईचा मुद्दा देखील चर्चेला आला असता केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा प्राप्त होताच ताबडतोब २७० कोटी रुपये नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देत असल्याचे एचडीएफसी पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्याने देण्याचे जिल्हास्तरीय समितीला अवगत केले. रब्बी हंगाम



२०२४ व २०२५ मधील कांदा पिक व मृगबहार व अमिया बहार या विमा क्षेत्राची पडताळणी करण्यात येणार असून नुकसानीच्या कुठल्या पूर्वसूचना स आलेल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना फारशी नुकसान भरपाई मिळणार नाही. तसेच केवळ कांदा पिकासाठी ५१ कोटी रुपयांचा हिस्सा पिक विमा कंपनीला जाणार आहे.

मात्र पडताळणी केल्यानंतर ४० कोटी रुपये वाचतील असेही चर्चा दरम्यान सांगण्यात आले. त्यामुळे दोन्ही क्षेत्राची पडताळणी करण्यात येणार आहे.

या बैठकीसाठी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा कृषी अधीक्षक रविंद्र माने, तक्रारदार व शेतकरी नेते अनिल जगताप, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, जिल्हा उपव्यवस्थापक नाबार्ड, कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर, सरव्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक धाराशिव, व्यवस्थापक युनिव्हर्सल शाम्पू पिक विमा कंपनी, क्षेत्रीय व्यवस्थापक भारतीय कृषी विमा कंपनी, व्यवस्थापक एचडीएफसी ग्रो जनरल इन्शुरन्स कंपनी तसेच जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयातील सोनटक्के, विधाते इत्यादी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त

### जि.प. माध्यमिक हिंगणी बु. शाळेचे एन एम एम एस परीक्षेत घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ फेब्रुवारी**

सन २०२४ २५ मध्ये झालेल्य एन एम एम एस परीक्षेत चा निकाल नुकताच जाहीर झालाअसून त्यामध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा हिंगणी बुद्रुक शाळेतील इयत्ता आठवी मधील विद्यार्थिनी कु.शेंडगे अमृता शिवराम व कु.मोरे अमृता बलभीम या विद्यार्थिनींनी परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे. दोघीही सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्या आहेत.

कु.शेंडगे अमृता शिवराम व कु.मोरे अमृता बलभीम यांच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रंजीत रुपनर, उपाध्यक्ष सुधाकर तंबूड , सरपंच योगेश सोळंके, ऋषी सोळंके , शाळेचे मुख्याध्यापक लोंढे सर, भायमारे सर, राठोड सर, श्याम धारक सर ,गडदे सर , बरमदे सर, सातपुते सर, आदमाने सर , शेख सर टाकळे सर, विशाल सोळंके, सर कदम,पवार मॅडम, शिंदे मॅडम व सोळंके आप्पा यांच्यासह गावकरी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

### शेतकऱ्यांना घोषणा नको अंमलबाजवणी करा–खा.पाटील

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**

महाराष्ट्रातील राज्य सरकार व केंद्र सरकार केवळ आम्ही शेतकऱ्यांच्या बाजूने कसे आहोत हे दाखवण्याचा देखावा हे सरकार करत असून शेतकऱ्यांना फक्त घोषणा दिल्या जात आहेत असं परखड मत काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत व्यक्त केले.

आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या बाबतीत अतिशय विदारक चित्र पहायला मिळत आहे. सोयाबीनला प्रति क्विंटल ६ ते ७ हजार रुपये भाव देऊ म्हणून निवडणुकीत मत घेणारे हे सरकार आज ३ हजार ८०० ते ४ हजाराने सोयाबीन विकत जात असताना सरकार काय करत आहे हमीभाव कशाला बांधला ? असे सवाल त्यांनी केले तसेच १ रुपया मध्ये पीक विमा आणला ही चांगली गोष्ट मात्र तो विमाच दिला जात नाही उलट महाराष्ट्रात ५०० कोटींचा घोटाळा या विम्यात झालाय हे भाजपचे एक आमदारच सांगत आहेत मग ही योजना सरकार मधल्या लोकांसाठी आणली गेली का ? असाही प्रश्न पडतो . महा उद्ध सारख्या पोर्टलवर केवळ योजनांच्या नोंदणीचा फार्स केला जातोय याचा प्रत्यक्षात लाभ किती आणि कधी मिळणार असे एक ना अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या बाबतीत अनुत्तरित असल्याचे खा.रजनीताई पाटील म्हणाल्या. तसेच सरकार कृषी क्षेत्रात आर्टिफीशीयल इंटेलिजन्स (ए आय) चा वापर करणार अशा घोषणा करणे म्हणजे एक फॅशनच झाली असल्याची टीका त्यांनी सरकारवर केली. शेतकऱ्यांच्या अशा विविध प्रश्नांवर खा.रजनी पाटील यांनी आवाज वठवत सरकारला चांगलेच धारेवर धरले व शेतकऱ्यांच्या मुख्य प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली त्यामुळे आता सरकार याची दखल घेऊन यामध्ये काय सुधारणा करणार हे महत्वाचे आहे.



# बीडमध्ये आ.संदीप क्षीरसागरांकडून बंधारा कम पुल जागेची पाहणी

### तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ
### शाहूनगर येथील रस्ता कामासह विविध ठिकाणच्या विकास कामांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ फेब्रुवारी**

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदार संघातील विकास कामांचा समतोल कायम ठेवला आहे मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात सुरू झालेली विकासकामे गतीने पुढे सरकावीत यासाठी स्वत: उभा राहून आमदार संदीप भैया लक्ष देत आहेत. शनिवारी (दि.८) सकाळी बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत असलेल्या जागेची त्यांनी पाहणी केली. तसेच तेलगाव नाका येथे पाण्याच्या नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत आहे.या जागेची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी करण्यात आली. लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात देखील होणार आहे. काम सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी व चाचण्या घेण्याचे काम सुरू आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.

बीड शहरातील तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी परिसरात सूरु असलेल्या रस्ता कामांची पाहणी केली. याबरोबरच बीड शहरातील प्रभाग क्र.२२ मधील कै.शिवाजी धांडे नगर भागातील मुख्य नाल्याची पाहणी करून नाल्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत आ.संदीप भैय्यानी संबंधित यंत्रणेस निर्देश दिले. तसेच या परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी देखील केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.सध्या बीड शहरातील शाहूनगरमधील आदर्श नगर भागात सिमेंट रस्ता कामासह विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी चर्चा केली. बीड शहरासह मतदारसंघातील विकास कामांचा वेग यापुढेही असाच कायम ठेवला जाईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.



## परळीत होणार पशुवैद्यकीय महाविद्यालय
## ना.पंकजाताई मुंडे यांचे पशुसंवर्धन खात्याला आदेश

**पशुविज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम उद्या परळीत येऊन करणार जागेची पाहणी**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ फेब्रुवारी**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे आदेश पशुसंवर्धन विभागाला दिले आहेत. महाविद्यालयांसाठी लागणाऱ्या जागेची पाहणी करण्यासाठी पशू विज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम परळीत दाखल होत आहे, लवकरच या कामाला गती येणार आहे.

राज्यात परळी वैजनाथ आणि बारामती या दोन ठिकाणी नवीन शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा ना. पंकजाताई मुंडे व उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बारामती येथे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात करण्यात आली होती. त्या अनुषंगाने या दोन्ही ठिकाणी महाविद्यालय स्थापन करण्याकरिता मुलभूत सोयीसुविधांचे निरीक्षण व भारतीय पशू चिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार आवश्यक असलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष तथा पशू विज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी.व्ही. तायडे, तांत्रिक अधिकारी डॉ पी. इ. ताकसांडे हे उद्या जागेची पाहणी करण्यासाठी येणार आहेत. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच सर्व संबधित अधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

ना. पंकजाताईंनी घेतला आढावा

शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणा सोबतच परळीत होणाऱ्या नवीन शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा आढावा घेतला होता. अधिकाऱ्यांच्या टीम कडून जागेचा निर्णय घेतला येणार आहे, त्यानुसार उद्याची पाहणी होत आहे.

## कौटुंबिक संस्काराची शिदोरी माता रमाईंकडून शिकावी – प्रा. संजय बागुल

### त्यागमूर्ती माता रमाई जयंती उत्साहात साजरी, सावरगावमध्ये भीमसैनिकांची भव्य उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ फेब्रुवारी**

येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली. गावातील सर्व भीमसैनिक, माता–भगिनी आणि युवक–युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांच्या एकजुटीमुळे आणि उत्कृष्ट संयोजनामुळे हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

गावातील सर्व भीमसैनिकांनी एकत्र येऊन हा जयंती उत्सव मोठ्या जोशात आणि अनुशासनात पार पाडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक मगर, प्रमुख पाहुणे अश्विन टाकणखार, केतन प्रधान, दीपक गायकवाड आणि साई ग्राफिक्सचे मालक अशोक कांबळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मुख्य वक्ते प्रा. संजय बागुल सर यांचे प्रभावी भाषण. त्यांनी आपल्या मनोगतात माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत, कौटुंबिक संस्कारांची खरी शिदोरी माता रमाईंकडून शिकावी असे प्रतिपादन केले. माता रमाई यांनी बाबासाहेब आंबेडकरांना पाठिंबा देत मोठ्या त्यागाने आणि संयमाने आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या त्यागातून आपल्या कुटुंब व्यवस्थेत समतोल राखण्याची शिकवण मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात क्रांतिसूर्य संस्थेच्या संपूर्ण टीमला सन्मानित करण्यात आले, तसेच आयोजकांनी उत्कृष्ट नियोजन करून संपूर्ण गावाला एकत्र आणले. संयोजकांचे आणि आयोजकांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, कारण त्यांनी गावाची एकजूट आणि सामाजिक कार्य करण्याची ताकद दाखवून दिली.रमाई नगर, सावरगाव येथील महिला मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. जयंती कमिटीच्या अध्यक्षस्थानी प्रदीप भैय्या फंदे, उपाध्यक्ष गणेश कुव्हारे, सचिव दीपक बोराडे आणि कोषाध्यक्ष प्रवीण कुव्हारे यांनी जबाबदारी पार पाडली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. धम्मानंद बोराडे, रंजीत वाघमारे, प्रल्हाद बोराडे सर, मुंजाबा कुव्हारे सर, सत्यप्रेम फंदे, बबलू फंदे, सुशिम बोराडे, अक्षय त्रिभुवन, राहुल कुव्हारे, शाम बोराडे, गोकुळदादा वाघमारे, प्रकाश बोराडे, अप्पा फंदे, अक्षय बोराडे, मुकेश कुव्हारे, सूरज शिनगारे, योगेश शिनगारे, संजय फंदे, राजेश सोनकांबळे, राहुल बोराडे, आदित्य बोराडे, प्रणव कुव्हारे बळीनाना थोरात,साहिल गाडेकर साहिल साळवे, सुधीर कू व्हारे ,अण्णाभाऊ बोराडे,आबासाहेब बोराडे निखील कुव्हारे आदींनी मेहनत घेतली.

## इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

**चिमुकल्यांनी जिंकले प्रेक्षकांचे मने**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहवर्धक व आनंदमयी वातावरणात साजरा करण्यात आले.



स्नेहसंमेलन संमेलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज,राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करून करण्यात आली.यावेळी शाळेतील लहान मुला–मुलांनी विविध हिंदी–मराठी गाण्यांवर अतिशय सुंदर असे नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकली तर ६ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी मोबाईलचे दुष्परिणाम सांगणारे जनजागृतीवर नाट्य सादर केले तर पहिलीच्या विद्यार्थ्यांनी पण प्रसंगावर गाणे सादर केले.

यावेळी कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणुन डॉ.बाळकृष्ण भवर,शिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे,सहा.पो मच्छिंद्र शेंडगे,अँड हनुमंत जाधव,केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे,पशुवैद्यकिय अधिकारी डॉ.गुंडाप्पा थळकरी,प.स.सदस्य उमाकांत भुसारी,डॉ.शिवाजी मस्के,जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड तर प्रमुख उपस्थितीत म्हणुन सरपंच सुरेश नांदे,सरपंच मंगेश गुजर,सरपंच अंगदराव इंगळे,सरपंच युवराज ढोबळे,सरपंच विश्वास शिनगारे,सरपंच अंकुराव करपे,उपसरपंच महेश लामतुरे,चेअरमन अरूण चोपणे,कृ.उ.संचालक अरूण राऊत,माजी उपसरपंच राजाभाऊ यादव, पिएसआय बाळासाहेब मस्के हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बापुसाहेब भुसारी सर्व शिक्षकवृंद कर्मचारी व श्री.स्वामी समर्थ प्रतिष्ठान व शिवशक्ती क्रिडा मंडळ यांनी परिश्रम घेतले.

### केज तालुक्याच्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करणे अभिमानास्पद

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**

खो–खो विश्वकप स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करत देशाला विश्वकप मिळवून देण्याची किमया या भागाच्या मातीतील प्रियंका इंगळेने केल्याची बाब अभिमानास्पद आहे. पालकांनी पाल्यांना त्यांच्या निवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे प्रतिपादन अंबा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेशराव आडसकर यांनी केले.शुक्रवारी (दि. ७) तालुक्यातील आडस येथे श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था व ग्रामस्थांच्या वतीने भारतीय महिला खो – खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हीच्या नागरी सत्कार सोहळ्यात श्री. आडसकर बोलत होते.

### नाईक सुभेदार बालाजी इंगळे यांचा सेवापूर्ती सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ फेब्रुवारी**

तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र बालाजी बब्रूवान इंगळे हे भारतीय सैन्यदलातून नाईक सुभेदार पदावर काम करून २४ व्या वर्षाची सेवा करून सेवानिवृत्त झाले.याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने दि २ रोजी सकाळी मिरवणूक काढून त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर जगन्नाथ कदम, प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर,सरपंच शशिकांत इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. गावकऱ्यांच्या वतीने नाईक सुभेदार बालाजी इंगळे यांची गावभर वाजत गाजत मिरवणूक काढली गावकऱ्यांच्या वतीने सहकुटुंब नागरी सत्कार करण्यात आला. मिरवणुकीत भारत माता की जय वंदे मातरम या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी बोलताना डॉ हनुमंत सौदागर म्हणाले, सैनिक देशाच्या सीमेवर रक्षण करतात म्हणून आपण घरात सुरक्षित आहोत. जय जवान जय किसान हाच नारा देशाच्या समृद्धीसाठी महत्त्वाचा आहे. सैनिकांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचा कायम सन्मान झाला पाहिजे. असे मत व्यक्त केले. सत्कारमूर्ती बालाजी इंगळे यांनी यापुढे समाजसेवेसाठी तत्पर राहील असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी माजी सैनिक संघटना विविध पदाधिकारी यांच्या हस्ते हे सेवापूर्ती गौरव निमित्ताने बालाजी इंगळे यांचा सत्कार करण्यात आला.



# सामान्य नागरीकांची अडवणुक खपवून घेणार नाही

## नगर परिषदेच्या आढावा बैठकीत आ.विजयसिंह पंडित यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ फेब्रुवारी**

कोट्यावधी रुपये खर्च करूनही शहरातील नागरीकांना नियमित स्वच्छ पाणी का मिळत नाही ? असा सवाल उपस्थित करून आ.विजयसिंह पंडित यांनी व्यापारी गाळ्यांचे लिलाव, शहरातील अस्वच्छता, बंद पडलेले पथदिवे, मालमत्ता करात केलेली बेसुमार वाढ, अतिक्रमण धारकांच्या हक्काचे पीटीआर, रखडलेला हद्दवाढीचा प्रस्ताव, अनुकंपा तत्वावरील प्रलंबित नियुक्त्या यांसह विविध प्रश्नांवर नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरले. सध्या पालिकेवर प्रशासक आहे, त्यामुळे कोणाच्याही राजकीय दबावाला बळी पडून सर्वसामान्यांची कामे अडवू नका, सामान्य नागरीकांची अडवणुक खपवून घेणार नाही असा इशारा आ.विजयसिंह पंडित यांनी दिला. नगर परिषदेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी आ.अमरसिंह पंडित, पालिकेचे प्रशासक विक्रम मांडूरगे यांच्यासह कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी रोजी गेवराई नगर परिषदेची आढावा बैठक घेवून सर्वसामान्यांच्या मुलभूत समस्यांच्या निराकरणासाठी पुढाकार घेतला. या बैठकीत माजी आ.अमरसिंह पंडित यांनी शहरातील विकास कामांचा आढावा घेवून मार्गदर्शन केले. पाणी पुरवठा योजनेसाठी ६६.७८ कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला असतानाही शहरातील नागरीकांना दररोज मुबलक स्वच्छ पाणी का मिळत नाही ? असा सवाल आ.पंडित यांनी उपस्थित केल्यामुळे आजवर विकासाचा गाजावाजा करणाऱ्या तथाकथीत कार्यसम्राटांच्या बोगसगिरीचा पडदाफाश झाला. नागरीकांना दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेले एक्सप्रेस फिडर आणि जलशुध्दीकरण यंत्रणा बसविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना आ.पंडित यांनी पालिका प्रशासनाला दिल्या. या बैठकीत बचतगटाच्या महिलांना कर्ज रक्कमेचे धनादेश आ.पंडित यांच्याहस्ते वाटप करण्यात आले.संजयनगरसह अतिक्रमण भागातील नागरीकांवर आजवरच्या राज्यकर्त्यांनी केलेल्या अन्यायाचा पाढा उपस्थित तक्रारदांनी या बैठकीत वाचला. कोणताही राजकीय भेदभाव न करता नियमाप्रमाणे पात्र असतील त्यांना तात्काळ हक्काचा पीटीआर देण्याचे निर्देश देताना आ.पंडित यांनी या प्रक्रियेतील दलालांचा बंदोबस्त करण्याची सूचना त्यांनी केली. गुगल फॉर्ममध्ये नागरीकांकडून अर्ज आजपासून भरून घेणे सुरु करत असल्याचे आश्वासन यानिमित्ताने मुख्याधिकाऱ्यांनी दिले. पालिकेला नवीन अग्निशमन वाहन खरेदी करण्यासह अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची उपदाने या बाबतची कार्यवाही दोन दिवसांत करून छत्रपती शिवाजी महाराज उद्यान शिवजयंतीपूर्वी नागरीकांसाठी खुले करण्याचे निर्देशही आ.पंडित यांनी या बैठकीत दिले. नाट्यगृह आणि जलतरण तलाव कार्यान्वित करण्याची सूचना देवून शहरात महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी शौचालय सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश त्यांनी यानिमित्ताने दिले.गेवराई शहरात भुमिगत गटार योजना, मुख्य रस्त्यांचे नुतणीकरण व सुशोभिकरण करणे, शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करून त्यावर फुटपाथ, डिव्हायडर बसविणे, जुन्या पाण्याच्या टाकीच्या जागेवर भव्य शॉपिंग कॉम्पलेक्स उभारण्यासह शहरातील विकास कामे करण्यासाठी आपण तत्पर असल्याचे आ.विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत सांगितले. या बैठकीच्या निमित्ताने गेवराई शहराबाबतचे व्हिजन त्यांनी लोकांसमोर मांडले. बैठकीत उपस्थित तक्रारदारांच्या तक्रारींचे त्यांनी तात्काळ निराकरण केले. घरकुलाचे अडकलेले हप्ते, दिव्यांगांना मिळणारे लाभ या बाबतच्याही सूचना त्यांनी यावेळी दिल्या. स्मशानभुमीत काम करणाऱ्या कामगाराचे मागील पाच वर्षांपासून वेतन थकीत असल्याप्रकरणी अतिशय कडक शब्दांत प्रशासनाला सूचना देत अशा कामगारांचे वेतन भविष्यात अडवू नका अशा सूचनाही त्यांनी बैठकीत दिल्या. नगर पालिका प्रशासनाच्यावतीने नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. बैठकीला आ.विजयसिंह पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

